**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३७

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोहंमद अब्दुल अजीज इंजिनिअर,<br>घर नं. १-१५-५०, नेहरु भवनजवळ, बुढ्ढी लेन, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>नाशिक | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>नाशिक | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक |

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक गैरहजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०४-२००९ रोजी आयोगासमोर व्दितीय अपील दाखल केले होते. या अपिलाच्या सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, अर्जदाराने प्रपत्र अ नुसार दिनांक १३-११-२००८ रोजी माहिती मागितली होती तथापि माहिती न मिळाल्याने अर्जदाराने प्रपत्र ब नुसार दिनांक ०३-०१-२००९ रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिका-याने कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने आयोगासमोर व्दितीय अपील दाखल केले आहे. अर्जदार अपिलार्थी यांचे म्हणणे व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अर्जदाराचे म्हणणे की ते नाशिक येथे जाऊ शकत नाहीत त्यामुळे अर्जदाराला माहिती पोस्टाने मिळावी. अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येऊन त्याप्रमाणे अर्जदाराला माहिती पुरविण्यात यावी. सदर माहिती ही विनामूल्य अर्जदाराला त्यांनी दिलेल्या पत्त्यावर दिनांक ३० ऑक्टोबर २०१० पर्यंत पुरविण्यात यावी.

अपिलीय अधिकारी आज रोजी सुनावणीसाठी गैरहजर आहेत असे जन माहिती अधिकारी यांच्या वतीने सांगण्यात आले. याबाबत अपिलीय अधिकारी यांनी यापुढे आयोगाकडील सुनावणीसाठी हजर राहण्याची दक्षता घ्यावी. यापुढे अशा प्रकारे गैरहजर राहू नये किंवा गैरहजर राहण्याबद्दल लेखी पत्र द्यावे. प्रथम अपील निकाली काढले नाही असे निदर्शनास आले आहे तर व्दितीय अपील आदेशानंतरही प्रथम अपील निकाली काढले नाही ही बाब जन माहिती अधिकारी सांगत आहेत हे मान्य केले तर प्रथम अपिलीय प्राधिकरणाने नुकसानभरपाईचा जो काही खर्च आहे तो त्या प्राधिकरणाने स्वतः करावा किंवा त्यांनी संबंधित अधिका-याकडून वसूल करावा याबाबत वरिष्ठ अधिका-याने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

वरील आदेशानंतरही अर्जदाराला सदर माहिती प्राप्त न झाल्यास अर्जदार माहिती अधिकार अधिनियमातील कलम १८ नुसार राज्य माहिती आयोगाकडे अर्ज करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# <u>आदेश</u>

१.  अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक  १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१  श्री. मोहंमद अब्दुल अजीज इंजिनिअर, घर नं. १-१५-५०, नेहरु भवनजवळ, बुढ्ढी लेन, औरंगाबाद.

२  जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३  जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४  निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६७

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. शिवाजी भाऊराव बनकर, : अपिलार्थी

रा. बुटखेडा पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), जालना यांच्यातर्फे श्री. डी. डी. ढाकरे, अव्वल कारकून हे हजर आहेत व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक ०५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली आहे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील देय असलेली संपूर्ण माहिती मूळ अर्जामध्ये दिलेल्या पत्त्यावर व सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी असे आदेशित केले आहे.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे व आज रोजी अर्जदार अपिलार्थी गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), जालना यांच्या प्रतिनिधीतर्फे असे सांगण्यात आले की, अर्जदाराला त्यांनी व्यक्तिशः

दिनांक ०७-०६-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार प्रतिनिधीने अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२००९ रोजी माहितीसाठीच्या अर्जावर अर्जदाराला माहिती पुरविल्याची सही घेतली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा. बुटखेडा पो. अकोला (देव), तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी , जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३६९

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. एम. एन. रोडगे, : अपिलार्थी

व्दारा- श्री. गायकवाड एस. एम.

योगेश निवास, बी फार्मसी कॉलेजजवळ, बार्शी रोड,

उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, श्री सिध्देश्वर निवासी विद्यालय,

वरवंटी, तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. नेरे गोकुळदास चंदर

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री सिध्देश्वर निवासी विद्यालय, वरवंटी, तालुका जिल्हा उस्मानाबाद व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे तर्फे श्री. बी. एस. पवार, अधीक्षक हे हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक ०५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली आहे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील उर्वरीत माहिती

व मुद्दा क्रमांक १ व ३ मधील संपूर्ण माहिती १५ दिवसाच्या आत टपालाव्दारे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित केले आहे.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आली आहे व आज रोजी अर्जदार अपिलार्थी गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री सिध्देश्वर निवासी विद्यालय, वरवंटी, तालुका जिल्हा उस्मानाबाद तसेच त्रयस्थ पक्ष म्हणून स्वतः हजर आहेत. त्यांनी अर्जदाराला पोच पावती दिनांक १६-०६-२०१० तसेच दिनांक २६-०६-२०१० या दोन्ही तारखेला उर्वरीत माहिती दिल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे व सदर माहितीने अर्जदाराचे समाधान झाले असल्यामुळे अपिलार्थी आज रोजी गैरहजर राहिले असावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एम. एन. रोडगे, व्दारा- श्री. गायकवाड एस. एम. योगेश निवास, बी फार्मसी कॉलेजजवळ, बार्शी रोड, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री सिध्देश्वर निवासी विद्यालय, वरवंटी, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७०

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. मिर्झा अबरार कदीर बेग, : अपिलार्थी
रा. ८७२, काझी गल्ली, वैजापूर, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री. दारुंटे हजर तसेच जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद श्री. विखे पाटील हजर आहेत.

अर्जदाराने मागितलेली माहिती आयोगाने दिलेल्या दिनांक ०७-०६-२०१० रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला दिनांक ०९-०७-२०१० रोजी व दिनांक ०४-१०-२०१० रोजी उर्वरीत माहिती दिली आहे व ती अर्जदाराला मिळाल्याचे त्यांनी आयोगासमोर मान्य केले आहे व मिळालेल्या माहितीवर त्यांचे समाधान झालेले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिर्झा अबरार कदीर बेग, रा. ८७२, काझी गल्ली, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७२

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. सुग्रीव सोपानराव मुंढे, : अपिलार्थी
सा. आत्ताच एक्सप्रेस, जे-१३ विजयश्री कॉलनी, एन-५,
सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना हे गैरहजर आहेत.

सदर प्रकरण या न्यायालयाने या आधी दिनांक ०७-०६-२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवले होते व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अर्जदाराला टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी असे आदेश दिले होते व त्यानंतर सदर प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी आले आहे. आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना व जन अपिलीय

अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना हे गैरहजर आहेत. अर्जदाराला माहिती मिळाली किंवा नाही याबाबत शहानिशा होऊ शकली नाही. मागील तारखेला सुध्दा कोणी हजर नव्हते यावेळीही कोणीही हजर नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०६-२०१० रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे अर्जदाराला माहिती पुरविली किंवा कसे याबाबत हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास अहवाल सादर करावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी या प्रकरणी आयोगासमोर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही दोन्ही तारखेला का अनुपस्थित होते याबाबत त्यांच्या स्तरावर चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुग्रीव सोपानराव मुंढे, सा. आत्ताच एक्सप्रेस, जे-१३ विजयश्री कॉलनी, एन-५, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७३

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. अश्फाक उल्ला खॉन हाफीज खॉन, : अपिलार्थी
रा. काझी गल्ली, वैजापूर, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थीने प्रपत्र अ नुसार त्यांचे ऐवजी त्यांचे प्रतिनिधी श्री. मिर्झा अबरार कदीर बेग यांना प्राधिकृत केले आहे. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्यातर्फे श्री. यादव माधवराव भूमे कार्यालयीन अधीक्षक हजर आहेत व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

प्रकरणात अर्जदाराला उपलब्ध माहिती दिलेली नाही. मुद्दा क्रमांक २ ची माहिती देण्यात आलेली नाही. तसेच आज रोजी आयोगासमोर दाखल केलेल्या उत्तराची प्रत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. ती

नष्ट करण्यात आलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे याबाबत ज्या प्राधिकरणाकडे माहिती उपलब्ध आहे त्या प्राधिकरणाचा पूर्ण पत्ता अर्जदाराला लेखी स्वरुपात द्यावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अशी सूचना देण्यात येत आहे की, सदरची माहिती नष्ट करण्याची काय पध्दत आहे व एका वर्षाच्या आत माहिती नष्ट केली जाते का, विना आदेशाशिवाय माहिती नष्ट केली जाते का याची सत्यता पडताळून पहावी व कार्यपध्दती सुधारण्याच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करावी व विना आदेश कोणतीही कागदपत्रे नष्ट करु नयेत.

वरील बाबी विचारात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अश्फाक उल्ला खॉन हाफीज खॉन, रा. काझी गल्ली, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७५

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. महंमद अकबर म. नवाज, : अपिलार्थी
माजी मु. अ. घर नं. ५-१-२६५, नगर गल्ली,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सदस्य, मॅनेजिंग कमेटी मदरसा मदिनतुल उलुम,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सदस्य, मॅनेजिंग कमेटी मदरसा मदिनतुल उलुम, नांदेड व जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड कोणीही हजर नाहीत.

या प्रकरणात या आधी दिनांक ०७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. सदर प्रकरण पुन्हा आज रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले. आज रोजी अर्जदार अपिलार्थी गैरहजर आहेत व उत्तरवादी हे सुध्दा गैरहजर आहेत. सदर प्रकरणात कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील बाबी आढळून आल्या आहेत.

याप्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार मॅनेजिंग कमिटी, मदरसा मदिनतुल उलुम, नांदेड या संस्थेकडे माहिती मागितली होती. अपिलार्थीने

मागितलेल्या माहितीच्या स्वरुपावरुन अपिलार्थीस ही माहिती मॅनेजिंग कमिटी, मदरसा मदिनतुल उलुम, नांदेड या संस्थेकडून अपेक्षित असल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारच्या संस्थांना माहिती अधिकार अधिनियम लागू नसल्याचा निर्वाळा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्र. ५२९४/२००८ च्या संदर्भात दिनांक २८-०४-२००९ रोजी दिलेला आहे. या निर्णयामध्ये अशा प्रकारची संस्था अधिनियमातील कलम २ (ज) मध्ये स्पष्ट केलेल्या सार्वजनिक प्राधिकरण या शब्दाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होऊ शकत नसल्याचा निर्वाळा दिला आहे. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे, त्या प्राधिकरणास माहिती अधिकार अधिनियम लागू होत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच यासंदर्भात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती व अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाचा भाग असणे गरजेचे आहे. या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त हे अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहिती मागविली आहे, त्या संस्थेशी संबंधित प्रकरणासंदर्भातील अपिलीय अधिकारी नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी प्रथम अपील अर्ज करताना अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदींचाही भंग केल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम अपील अर्ज हे चुकीच्या प्राधिकरणाकडे केले असल्याने आणि विशेषत: अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमान्वये माहितीसाठीचा अर्ज केला आहे, त्या प्राधिकरणास माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येत आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितल्यास त्यांना ही माहिती शिक्षणाधिकारी कार्यालया-

कडून प्राप्त होऊ शकेल, त्यामुळे त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीकरिता शिक्षणाधिकारी यांच्याकडे अर्ज करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक १९-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महंमद अकबर म. नवाज, माजी मु. अ. घर नं. ५-१-२६५, नगर गल्ली, नांदेड.
२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य, मॅनेजिंग कमेटी मदरसा मदिनतुल उलुम, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७६

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक महादेवआप्पा सवादे,<br>रा. केसापुरी, तालुका माजलगाव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केसापुरी, तालुका<br>माजलगाव, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव,<br>तालुका माजलगाव, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : ज्ञानोबा गणपती निंबाळकर

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केसापुरी, तालुका माजलगाव, जिल्हा बीड व जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने प्रपत्र अ नुसार दिनांक ०७-०८-२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केसापुरी, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांच्याकडे अर्ज

करुन घर नंबर १५० मौजे केसापूरी या मिळकतीस ज्ञानोबा गणपती निंबाळकर यांचे नाव कशा आधारे नोंदविले आणि कोणत्या वर्षात नोंदविले याची माहिती देऊन त्यांच्या पिटीआर ची नक्कल मागितली होती. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ज्ञानोबा गणपती निंबाळकर यांचे नाव नोंदविण्यात आले ते कोठल्या कागदपत्राच्या आधारे नोंदविले आहे व त्यात संबंधितांना नोटीसा काढल्या किंवा नाही. सदरची माहिती अर्जदारास न मिळाल्याने अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव यांच्याकडे माहिती मागितली आणि कलम १९ (१) नुसार प्रथम अपील दाखल केले. अपील दाखल करण्यासाठी माहिती अर्जाचे पाकीटच घेतले नाही, माहिती दिली नाही अशी तक्रार केली होती. सदरचे प्रथम अपील अपिलार्थीने दिनांक १८-०८-२००९ रोजी केले. या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव यांनी दिनांक ३१-०८-२००९ रोजी ग्रामसेवक केसापुरी यांना पत्र सुध्दा दिले. सदर प्रकरणी आयोगाकडे दिनांक ०७-०६-२०१० रोजी दुपारी ०३-०० वाजता सुनावणी घेण्यात आली. आज रोजी या प्रकरणाची पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता प्रकरणात कलम १९ (१) च्या तरतुदी पूर्ण झालेल्या नाहीत त्यामुळे सदर प्रकरणात अपेक्षित असलेली तरतुद पूर्ण करण्यासाठी या प्रकरणात पुन्हा प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन त्यात अर्जदाराने मागितलेली माहिती कोणती आहे तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणती माहिती उपलब्ध आहे याबाबत लेखी घ्यावे तसेच या प्रकरणात माहिती देण्यासाठी किती विलंब लागला आहे या सर्व बाबींची शहानिशा करावी. तसेच अर्जदारास आदेश लेखी स्वरुपात द्यावे. या प्रकरणात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव यांनी दिनांक २९-१०-२०१० रोजी सकाळी ११-०० वाजता सुनावणी घ्यावी. अर्जदार व जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय केसापुरी यांचे लेखी व तोंडी म्हणणे ऐकून घ्यावे व आदेश पारीत करावा. त्याची एक प्रत अर्जदाराला पुरविण्यात यावी व सुनावणी घेतल्यापासून ८ दिवसाच्या आत निर्णय देण्यात यावा व यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास ते आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक महादेवआप्पा सवादे, रा. केसापुरी, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत केसापुरी, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३७७

निर्णय दिनांक : १९-१०-२०१०

१. श्री. कचरे अशोक सजन, : अपिलार्थी
रा.कडा, ता.आष्टी, जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड.

२. जन अपिलीय अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

अर्जदाराने दिनांक २९-०९-२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर प्रकरणात या आधी दिनांक ०७-०६-२०१० रोजी सुनावणी झाली होती. तेव्हा अर्जदार हजर होते व उत्तरवादी उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड गैरहजर होते. आज रोजी अर्जदार गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अर्जदाराने मागितलेली माहिती जन्मतारखेच्या दुरुस्तीबाबतची आहे व ती माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी दिनांक २३ जुलै २००९ ला पुरविली आहे व मूळ अभिलेखे तपासणीकरिता पत्र दिले होते. परंतु अर्जदार हजर राहिले नाहीत. तसेच अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दिनांक २५-०३-२००९ रोजी अर्ज पाठविला आहे व असलेल्या जन्मतारखेत बदल करुन तशी माहिती त्वरीत द्यावी असे म्हटले आहे. अर्जदाराने कार्यवाही मागितली आहे. व कार्यवाही ही माहिती, माहितीच्या अधिकारामध्ये नाही तसेच जन्मतारखेमध्ये बदल करुन घ्यावयाचा असेल तर तो नियमानुसार योग्य ती पध्दत

अर्जदाराने अवलंबणे अपेक्षित आहे तसेच मागितलेली माहितीच्या कार्यवाहीबाबत अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कचरे अशोक सजन,रा.कडा, ता.आष्टी, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८०

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. बिपीनचंद्र केशवराव पाटील, : अपिलार्थी
रा. 'केशवरजनी', एन-११, एच-सेक्टर, प्लॉट नं. ०५,
नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक पणन अधिकारी, सिडको, नवीन औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रशासक, सिडको, नवीन औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : शरद प्रतिष्ठान

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा सहायक पणन अधिकारी, सिडको, नवीन औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक सिडको, नवीन औरंगाबाद हजर आहेत.

सदर प्रकरण या आयोगाने या आधी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवले होते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास आले आहे की, दिनांक ०८-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी १४-०३-२००९ रोजी विनामूल्य माहिती पुरविल्याचे कबूल केले होते. तसेच मुद्दा क्रमांक २, ३ शी संबंधित अंशतः व मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती पुरविण्याचे कबूल केले होते. जन माहिती

अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार माहिती स्पीड पोस्टाने पाठविण्यात आली आहे. परंतु आज रोजी त्यांच्याकडे कोणताही पुरावा उपलब्ध नाही. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य माहिती ८ दिवसाच्या आत पुरवावी.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बिपीनचंद्र केशवराव पाटील, रा. 'केशवरजनी', एन-११, एच-सेक्टर, प्लॉट नं. ०५, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पणन अधिकारी, सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८१

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. रणजीत हरीभाऊ मनोरे, : अपिलार्थी
रा. रेल्वे स्टेशन, जहागीरदार कॉलनी, सर्व्हिसिंग सेंटरच्या बाजूला, पैठण रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तंत्र शाखा तथा विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी (नियोजन), विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी (नियोजन), विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद हजर आहेत.

सदर प्रकरण या न्यायालयाने या आधी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवले होते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व संबंधितांच्या युक्तिवादाचे अवलोकन करता असे निदर्शनास आले आहे की, अर्जदाराने जवळपास २८ सार्वजनिक प्राधिकरणांची तालुका स्तरावरील कृषि विभागाची माहिती मागितली आहे. उत्तरवादी यांनी २८ विभागांच्या तालुका कृषि अधिका-यांना लेखी पत्र दिले आहे. यातील अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे सदर विभागांची अर्जदाराला माहिती मिळालेली नाही. तसेच फुलंब्री, कन्नड, सोयगाव, सिल्लोड, खुलताबाद व औरंगाबाद यांच्याकडे अपिलार्थी ८ दिवसात पैसे जमा करतील. भोकरदन विभागाने दिनांक १५-०६-२००९ रोजी ५२० रुपये भरणा करण्यासाठी पत्र दिले आहे. जालना विभागाने कार्यालयात येऊन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले आहे. तसेच अंबड, मंठा या विभागाची माहिती निरंक असल्याबाबत कळविले आहे. त्यामुळे येथील माहिती देण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही. गेवराई, बीड, अंबाजोगाई, माजलगाव या विभागांनी माहिती निरंक असल्याबाबत कळविले आहे. तसेच धारुर, आष्टी, परळी, घनसावंगी व गंगापूर या विभागांना याबाबत विभागीय कृषि सह संचालक यांनी पत्र देऊन अर्जदाराला माहिती देण्यासंदर्भात पत्रव्यवहार करण्याचे सांगितले. वैजापूर विभागाने कार्यालयात येऊन माहिती अवलोकन करावी असे कळविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांनी वरील आदेश मिळाल्यापासून सर्व प्रकारच्या प्रक्रिया ८ दिवसाच्या आत पूर्ण कराव्यात. ज्या जन माहिती अधिका-यांनी अर्जदाराला पैसे जमा करण्याबद्दल सूचित केले आहे त्याबाबत अर्जदाराने एक महिन्याच्या आत त्यांच्या कार्यालयात पैसे भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी आणि ज्या कार्यालयांची माहिती निरंक आहे त्यांच्यावर बंधन राहणार नाही.

उत्तरवादी यांनी आयोगासमोर सादर केलेला पत्रव्यवहार व जी माहिती दिलेली आहे त्यांचे पत्र अपिलार्थीस देण्यात आले. यानंतरही अपिलार्थीस माहिती मिळाली नाही तर ते नियमानुसार तक्रार दाखल करु शकतील.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>**आदेश**</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक १९-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रणजीत हरीभाऊ मनोरे, रा. रेल्वे स्टेशन, जहागीरदार कॉलनी, सर्व्हिसिंग सेंटरच्या बाजूला पैठण रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी (नियोजन) विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८२

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गणेश साहेबराव लांडगे,<br>रा. पंचशीलनगर (मंजरथ रोड), माजलगांव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय, माजलगाव, तालुका माजलगांव,<br>जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,<br>माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड हजर आहेत.

सदर प्रकरण आयोगाने या आधी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवले होते. त्यावेळेला अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर होते. या

सुनावणीच्या वेळेला अर्जदाराचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राबाबत संशय व्यक्त करण्यात आला होता. उत्तरवादी यांनी असे म्हणणे मांडले की, अर्जदाराने माहिती व्यक्तिशः मागितली असल्यामुळे व ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अर्जदार उपस्थित राहिले नाहीत. अर्जदाराचे म्हणणे असे आहे की अर्जदाराला दिलेले हे आदेश मिळाले नाहीत. अर्जदाराच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची योग्य तपासणी करुन १० दिवसाच्या आत माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. तसेच जर संबंधित प्रमाणपत्र वैध नसेल तर नियमानुसार प्रक्रिया अवलंबवावी. प्रथम अपील घ्यावे. प्रथम अपील सुनावणीसाठी अर्जदाराला लेखी पत्र देऊन अपिलीय अधिका-याने १० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन तसे स्पष्ट आदेश पारीत करावे. या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी व्दितीय अपील करु शकतील.

जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराकडून दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राबाबत पुरावा प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची वैधता प्रथमतः त्यांच्या स्तरावर तपासून जर अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत असे सिध्द झाले तर त्यांना त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी दोघेही गैरहजर आहेत. याबाबत सह संचालक (कृषि) औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी नोंद घ्यावी.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक १९-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गणेश साहेबराव लांडगे, रा. पंचशीलनगर (मंजरथ रोड), माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सह संचालक (कृषि) औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८३

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१ श्री. पांडुरंग विठ्ठलराव चव्हाण, : अपिलार्थी

मु. थेटेगव्हाण, पोस्ट चोरांबा, तालुका धारुर, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती धारुर, तालुका

धारुर, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड कोणीही हजर नाहीत.

सदर प्रकरण आयोगाने या आधी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवले होते. सुनावणीस अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांचे प्रतिनिधी हजर होते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धारुर यांच्याकडे त्यांच्या स्तरावरील माहिती मागविली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली

माहिती ही आंबेवडगाव केंद्राशी संबंधित आहे. त्यामुळे अपिलार्थीस केंद्रीय शाळा स्तरावरील माहिती अपेक्षित असावी असे अनुमान काढण्यास हरकत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गट शिक्षणाधिकारी यांच्या ताब्यात नसल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत केंद्रीय शाळा प्रमुखाकडे सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती न करता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती स्वतःकडेच मागवून घेतली आणि नंतर परत हीच माहिती अपिलार्थीस देण्यासाठी मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा थेटेगव्हाण यांना सूचित केले. मुख्याध्यापकाने अपिलार्थीस सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्याऐवजी त्यांच्याकडून माहिती घेऊन जाण्याचा निरोप अपिलार्थीस दिला. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती देण्याची ही कृती सर्वस्वी गैर व चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या माध्यमाद्वारे माहिती मागितली आहे त्या माध्यमाद्वारे अर्जदारास माहिती पुरविणे हे संबंधित गट शिक्षणाधिकाऱ्यांचे / केंद्र प्रमुखाचे कर्तव्य होते. तथापि आपले हे कर्तव्य त्यांनी बरोबर पार पाडले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने दिनांक १६-०६-२००९ रोजी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०६-२००९ रोजी उपलब्ध होती. तथापि ही माहिती त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात विनंती केल्याप्रमाणे त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे न पाठविता ती अपिलार्थीस, त्यांच्या गावातील शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत प्राप्त करुन घेण्याच्या तोंडी सूचना दिल्या. त्यांच्या हातून घडलेल्या अशा प्रकारच्या अनियमिततेमुळे अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती धारुर व केंद्र प्रमुख यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या प्रकरणाशी संबंधित गट

शिक्षणाधिकारी व केंद्र प्रमुख यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या प्रकरणाशी संबंधित गट शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक १९-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग विठ्ठलराव चव्हाण, मु. थेटेगव्हाण, पो. चोरांबा, ता. धारुर, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८४

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

१. श्री. अहिरे सुनिल हरिचंद्र, : अपिलार्थी
द्वारा-डॉ. सुनिल जाधव, राष्ट्रीय अध्यक्ष, मानव विकास आंदोलन, वसुंधरा, बी-१५५,विवेकनगर,जागृती पाटी, वसमत रोड,परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी

२. जन अपिलीय अधिकारी
तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी.

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी , जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी सर्व गैरहजर आहेत.

सदर प्रकरण या आयोगाने दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवले होते. त्यावेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर होते. त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास आले आहे की, सदर प्रकरणात उत्तरवादीचे म्हणणे ऐकून घेतले तसेच हे आयोग खालील निष्कर्षाप्रती आलेले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती इतकी मोठी आहे की, कोणत्याही शासकीय प्राधिकरणास अशाप्रकारची माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देता येणे शक्य नाही. कारण ही माहिती अर्जदारास देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार होती. अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त व्हावयाच्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी असलेल्या माहितीच्या संदर्भातील अभिलेख्यांची तपासणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून करावी. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांना अद्यापपावेतो अपिलार्थीस ज्या मुद्यांवरील माहिती देणे बाकी आहे, त्या मुद्यांशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये अनुदानाच्या उपलब्धतेनुसार विनामूल्य पुरवाव्यात.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>**आदेश**</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**

**दिनांक -१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अहिरे सुनिल हरिचंद्र,द्वारा-डॉ. सुनिल जाधव, राष्ट्रीय अध्यक्ष, मानव विकास आंदोलन, वसुंधरा, बी-१५५,विवेकनगर,जागृती पाटी, वसमत रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८५

निर्णय दिनांक : १९-१०-२०१०

१. श्री. श्रीकांत लक्ष्मणराव वाईकर, : अपिलार्थी
रा. जिंतूर कॉलनी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

२. जन अपिलीय अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. शेख नईम शेख महबुब,
श्री. के. एस.वाघमारे

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी हजर, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

सदर प्रकरणी या आयोगाने या आधी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणी ठेवली होती. त्यावेळीही अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर

परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी हजर, जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी व त्रयस्थ पक्ष गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. अपिलार्थीचे दिनांक १९-१०-२०१० रोजीचे पत्र, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी केलेला युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे या सर्वांचा विचार करता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीकांत लक्ष्मणराव वाईकर, रा. जिंतूर कॉलनी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१०

निर्णय दिनांक १९-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मनोहर नामदेवराव मचाले,<br>रा. नामलगाव फाटा, खडी क्रेशर समोर, नामलगाव रोड,<br>घोसापुरी, पो. माळापुरी, तालुका जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक ०७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळीही अर्जदार गैरहजर होते. तसेच नायब तहसीलदार बीड व तहसीलदार बीड यांच्यातर्फे श्री. शेख अमीर अव्वल कारकून हे हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

प्रकरणातील कागदपत्रांची पाहणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, अर्जदारास सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अर्जावर अपिल सुनावणी न घेता तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र पाठवून कागदपत्रे घेऊन जाण्याबाबत कळविले. जन

माहिती अधिकारी यांना अपिलीय अधिका-याने माहिती देण्याबाबत त्यांनी केलेल्या बेकायदेशीर कृतीबाबत शास्ती अथवा दंड केलेला नाही व अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, महाराष्ट्र जमीन महसूल कायद्याच्या कलम १४३ प्रमाणे सर्व्हे नंबर ६८/अ व सर्व्हे नंबर १९९ मौजे आनंदवाडी बांधावरुन रस्ता मंजूर करणे आणि संचिका क्रमांक ९९/जमाबंदी/कावि, निकाल तारीख ०४-०६-१९९९ या विषयावर एकूण चार मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०७-०६-१९९९ चे आदेश, म. ना. मचाले व इतरांनी दिनांक २८-०४-१९९९ रोजी दिलेल्या अर्जाची प्रत, चौकशी पंचनामा, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांना मोजणी करण्यासंबंधी दिलेले आदेश - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील संचिकेचे अवलोकन करुन त्यांनी माहितीच्या नकला घेऊन जाव्यात असे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

दिनांक ०७-०६-२०१० रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी व आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर

असे सांगितले की, अपिलार्थीस अवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून घेऊन जाण्याबाबत सूचना केली होती. तथापि अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत व त्यामुळे अपिलार्थीस माहिती मिळू शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही स्पष्ट स्वरुपाची आणि अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मूळात त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत डाकेने माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी नोंदणीकृत डाकेव्दारे प्रतिसाद देऊन, आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, त्यांना अधिनियमातील कलम ७ (३) (क) मधील तरतुदीचे पालन करुन देण्याऐवजी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील संबंधित संचिकांचे अवलोकन करुन त्यातून अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याचे सूचित करण्याची, जन माहिती अधिकारी यांची कृती ही सर्वस्वी गैर व चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य असते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना स्वत: होऊन देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे सूचित करुन अपिलार्थीस त्यांच्या संचिकेतून कार्यालयातील संचिकांची माहिती उपलब्ध करुन घेण्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या हातून घडलेली सदर चूक ही पूर्णपणे बेकायदेशीर आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य पुरवावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील

संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोहर नामदेवराव मचाले, रा. नामलगाव फाटा, खडी क्रेशर समोर, नामलगाव रोड, घोसापुरी, पो. माळापुरी, तालुका जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८६

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१. श्री. राचमाळे धोंडिराम भागुराम, : अपिलार्थी
अभिनव नगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

२. जन अपिलीय अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, लातूर

त्रयस्थ पक्ष : सौ. सविता धोंडिराम राचमाळे

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था लातूर हजर, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर गैरहजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या

प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विविध विषयावरील माहिती एकूण सात मुद्यांद्वारे मागितली होती. यापैकी मुद्दा क्र. २ व ४ वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती ही अपिलार्थीस देय होत नाही. या उर्वरित मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विविध प्राधिकरणाशी संबंधित कार्यवाही करणेबाबत विनंती केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्यांद्वारे केलेल्या विनंतीवर जन माहिती अधिकारी यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे अपेक्षित असल्याने आणि अशाप्रकारच्या प्रक्रिया करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ४ वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ४ शी संबंधित माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. त्यापैकी मुद्दा क्र.२ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०६.०९.२००६ रोजीच्या त्यांच्या कार्यालयात केलेल्या अर्जाचा त्यांनी शोध घेऊन या अर्जासंदर्भात त्यांनी त्यातील विषयासंदर्भात वेगवेगळया प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि या विषयावर त्यांच्याकडील अभिलेख्यात उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस या मुद्यासंदर्भात माहिती म्हणून पुरवाव्या लागतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने सहायक निबंधक सहकारी संस्था, अहमदपूरचे श्री. एस.पी.बडे यांनी नेमलेल्या श्री. के.आर. घुले- यांच्या चौकशी अहवालाच्या प्रती मागितल्या आहेत. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे त्यांना या मुद्यावरील माहिती, अपिलार्थीस द्यावी लागेल.

अशाप्रकारे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ४ शी संबंधित संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच

सात दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १३.०१.२००९ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असल्यामुळे अपिलार्थीची संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर शास्तीची कारवाई करण्याची विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ४ शी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राचमाळे धोंडिराम भागुराम, अभिनव नगर,कंधार, जि.नांदेड-४३१ ७१४.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन),सहकारी संस्था, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८७

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१. श्री. अजय (भैय्या) ज्ञानेश्वर साळुंके, : अपिलार्थी
शिवछत्रती नगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद हजर आहेत व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद गैरहजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या नावाने लेखी पत्र दिले. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, दिनांक ०८-०६-२०१० रोजीच्या सुनावणीस ते हजर होते व अपीकर्त्यास माहिती पुरविली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी याबाबतचा आपला अहवाल दिनांक १९-१०-२०१० ला पाठविला आहे आणि मुद्दा क्रमांक ३ व ५ वगळता उर्वरीत मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २०-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजय (भैय्या) ज्ञानेश्वर साळुंके, शिवछत्रती नगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८८

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१ श्री. रविंद्रनाथ विश्वनाथराव बांगर, : अपिलार्थी
मंगळवारा बाजार, पोळा मारोतीमागे,
हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
नगर परिषद कार्यालय, हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लिपीक, नगर परिषद कार्यालय, हिंगोली

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद कार्यालय, हिंगोली व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद कार्यालय, हिंगोली व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली हे सर्व हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन

अपिलीय अधिकारी यांनी दाखल केलेली कागदपत्रे यांचे अवलोकन करता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रविंद्रनाथ विश्वनाथराव बांगर, मंगळवारा बाजार, पोळा मारोतीमागे, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३८९

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीपाल अशोकराव बस्तापुरे,<br>रा. रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय निवाडा,<br>तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,<br>रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी आज रोजी सुनावणी दरम्यान गैरहजर आहेत तसेच उत्तरवादी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय निवाडा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर व जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर हे दोघेही गैरहजर आहेत.

या प्रकरणात आधी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय निवाडा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर व जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर हे सर्व हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची

मागणी केली होती. तथपि व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी उपस्थित राहिले याबाबतचा पुरावा त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्यासाठीचे उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले असल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीच्य प्रथम अपील अर्जावर सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित होते. यासंदर्भातील योग्य तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केला. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी सुचवतील त्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे करुन ही माहिती त्यांच्याकडून स्वतः उपस्थित राहून हस्तगत करुन घ्यावी.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीपाल अशोकराव बस्तापुरे, रा. रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय निवाडा, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९०

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१ श्री. नरुटे विक्रम गोविंद, : अपिलार्थी

मु. पो. भोत्रा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन परंडा,

तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, भूम, तालुका भूम,

जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय पोलीस अधिकारी, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद व जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी, भूम जन माहिती अधिकारी म्हणून व अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद हे अपिलीय अधिकारी आहेत. तथापि अपिलार्थीने प्रथम अर्ज करताना तो पोलीस निरीक्षक, परंडा यांच्याकडे केला होता. त्यावेळी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, परंडा यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत उपविभागीय पोलीस अधिकारी, भूम यांच्याकडे सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठवून त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केली नाही. तसेच अपिलार्थीने दिनांक १७-०७-२००९ रोजी अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांच्याकडे प्रथम अपील करण्याऐवजी ते उपविभागीय पोलीस अधिकारी, भूम यांच्याकडे केले. उपविभागीय पोलीस अधिकारी, भूम यांनी देखील अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज अपर पोलीस अधीक्षकाकडे पाठवून देण्याऐवजी त्यांची अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली नसल्यामुळे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. अशा प्रकारे या प्रकरणी पोलीस निरीक्षक, परंडा व उपविभागीय पोलीस अधिकारी, भूम यांनी चुकीची कारवाई करुन त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस वंचित ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, भूम यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये कोणत्याही

कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांकडून व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नरुटे विक्रम गोविंद, मु. पो. भोत्रा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९१

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१ श्री. करीम बेग कादर बेग, : अपिलार्थी
वाहन चालक, तहसील कार्यालय, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०८-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर पुन्हा संधी देण्यासाठी सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची मागितली असून, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००९ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक २१-०२-२००९ रोजी पुरविली आहे व आता सुनावणीसाठी प्राप्त माहितीवर भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्यामुळे व प्राप्त माहितीवर त्यांचे समाधान झाले असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रथम अर्जावर सतर्कतेने कारवाई करावी, अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**

**दिनांक २०-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. करीम बेग कादर बेग, वाहन चालक, तहसील कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,

भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९२

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१ श्री. अहेमद जलीस, : अपिलार्थी

रा. कैसर कॉलनी, गल्ली नं.२, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : औरंगाबाद जिल्हा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संघ

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद गैरहजर व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद आणि त्रयस्थ पक्ष हजर आहे.

या प्रकरणात दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी हजर आणि त्रयस्थ पक्ष हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व सर्व संबंधितांचा युक्तिवाद पाहता असे निदर्शनास आले आहे की, अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराला सदर माहितीची आवश्यकता उरलेली नाही व अपिलाबाबतही काही तक्रार नाही. अर्जदाराने सदर अपील खारीज करण्याची विनंती केलेली आहे. अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येत आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अहेमद जलीस, रा. कैसर कॉलनी, गल्ली नं.२, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९३

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१ श्री. रामेश्वर तुळशीराम करपे, : अपिलार्थी
मु. पो. माळीवाडगाव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय,
लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद हजर व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रमांक १, औरंगाबाद गैरहजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, मागील सुनावणीत दिलेल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०६-२०१० रोजी माहिती पुरविलेली आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २०-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामेश्वर तुळशीराम करपे, मु. पो. माळीवाडगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र. १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र. १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९४

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भगवान फकिरबा खरात,<br>मु. पो. भवन, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, माहोरा,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,<br>तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, माहोरा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना |
| | त्रयस्थ पक्ष | : | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी , जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, माहोरा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना हजर व जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना गैरहजर आहेत.

सदर प्रकरण या आयोगाने या आधी दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणीसाठी ठेवले होते. त्यावेळी अर्जदार अपिलार्थी , जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, माहोरा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना व जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज दिनांक २०-१०-२०१० रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांना त्यांनी मागितलेली माहिती मिळाली नाही. मागील सुनावणीच्या वेळी अर्जदाराला काही माहिती पुरविण्यात आली. कर आकारणी संबंधी सन १९८४-८५ ते २००५ पर्यंतच माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सन २००५ च्या पुढील कर आकारणी केलेली नाही. तसेच फकिरबा तान्हाजी (मयत) यांच्या वारसाची नोंद घेतली का याबाबतची माहिती विचारली होती ती माहिती मिळाली नाही. याबाबत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे व चौकशी न्यायालयात प्रलंबीत आहे असे जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे सांगण्यात आले. तसेच सदर प्रकरणात अर्जदाराच्या कागदपत्राची पाहणी केली असता दिलेले उत्तर व माहिती योग्य असल्याचे आढळून आले आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २०-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान फकिरबा खरात, मु. पो. भवन, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.
२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, माहोरा, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९५

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१ श्री. शामराव रामराव जगताप, : अपिलार्थी

रा. पानशेंद्रा, पोस्ट जामवाडी, तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबड, तालुका अंबड,

जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, तालुका अंबड,

जिल्हा जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय अंबड, जि. जालना

त्रयस्थ पक्ष : १) श्री. शाम राठोड २) श्री. बारगाजे

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय अंबड, जि. जालना हजर व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना गैरहजर आणि त्रयस्थ पक्ष श्री. शाम राठोड व श्री. बारगाजे हजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळीही अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि त्रयस्थ पक्ष शाम राठोड हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी आयोगाच्या नावाने दिनांक ०३-०२-२०१० रोजी पत्र दिले आहे व त्यांनी मागितलेली माहिती मिळाली असल्याचे व अपील निकाली काढण्याची विनंती केलेली आहे. अपिलार्थीची सदरची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव रामराव जगताप, रा. पानशेंद्रा, पोस्ट जामवाडी, तालुका जिल्हा जालना.
२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९६

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१. श्री. बांगर चंद्रकांत सदाशिव, : अपिलार्थी
द्वारा नवजीवन शिक्षक कॉलनी नं.२ प्लॉट क्र. ५
बसस्टॅण्डच्या मागे, 'शिवसदन',
बीड -४३१ १२२

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय,
जिल्हा परिषद, बीड

२. जन अपिलीय अधिकारी
तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : समाजकल्याण निरिक्षक / अधीक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बीड

जन अपिलीय अधिकारी : समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, बीड

त्रयस्थ पक्ष : अध्यक्ष/सचिव, निवासी मतिमंद विद्यालय, बीड

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण निरिक्षक / अधीक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बीड गैरहजर, जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, बीड हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतर या आयोगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्याबद्दल आदेशित केले होते. त्यानुसार अर्जदाराला दिनांक ०६-०७-२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आज रोजी समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, बीड यांनी तसे पत्र दाखल केले आहे.

वरील बाबी लक्षात घेता व दिनांक ०९-०६-२०१० रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या आदेशाचे पालन केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बांगर चंद्रकांत सदाशिव, द्वारा नवजीवन शिक्षक कॉलनी नं.२ प्लॉट क्र. ५ बसस्टॅण्डच्या मागे, 'शिवसदन', बीड -४३१ १२२

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण निरिक्षक / अधीक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-अ,जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९७

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१. श्री. हिवराळे राजेश सांडुजी, : अपिलार्थी
द्वारा सोनवणे बी.व्ही. (वनपाल),
घ. क्र.-२६१, मिलींद नगर, उस्मानपूरा,
औरंगाबाद -४३१ ००५

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक

२. जन अपिलीय अधिकारी
तथा अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय,नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : सहायक आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. चंद्रकांत महादेव खाडे (भा.व.से.) प्रादेशिक व्यवस्थापक वन विकास महामंडळ, नाशिक

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक व त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व अपिलार्थीस सुमारे सात महिन्यांचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर माहिती देऊन स्पष्ट केलेल्या

त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त,आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक अधिकारी/ कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार 'माहिती अधिकारी' समजावे अशी तरतुद आहे, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी आज रोजी हजर आहेत त्यांनी अशी तक्रार केली की, श्री. वाय. बी. शिंदे कनिष्ठ लिपीक, अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नाशिक यांना दिनांक २८-१०-२००९ व दिनांक ०६-११-२००९ रोजी लेखी पत्रे देऊन सुध्दा त्यांनी माहिती न पुरविल्यामुळे अर्जदाराला माहिती पुरविणे शक्य झाले नाही.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १, २, ४ व ९ शी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे यासंदर्भात माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**

**दिनांक २०-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हिवराळे राजेश सांडुजी, द्वारा सोनवणे बी.व्ही. (वनपाल), घ.क्र.-२६१, मिलींद नगर, उस्मानपूरा,औरंगाबाद -४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी,आदिवासी विकास कार्यालय, आदिवासी विकास भवन, गडकरी चौक,नाशिक -३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,आदिवासी विकास कार्यालय, आदिवासी विकास भवन, गडकरी चौक,नाशिक -३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास भवन, गडकरी चौक,नाशिक -३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९८

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१. श्री. पटनुरे संतोष नागोराव, : अपिलार्थी
रा. गांजुर, पोस्ट रामेश्वर, तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

२. जन अपिलीय अधिकारी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, लातूर यांच्यातर्फे प्रतिनिधी श्री. बी. एस. बनसोडे, समाज कल्याण निरीक्षक हजर व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर गैरहजर आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांचे दिनांक १८-१०-२०१० रोजीचे आयोगास पत्र देऊन सुनावणीची तारीख वाढवून द्यावी अशी विनंती केली आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. बी. एस. बनसोडे, समाजकल्याण निरीक्षक यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने माहितीपोटीच्या शुल्काचा दिनांक ०६-०६-२००९ रोजी चलनाव्दारे भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक १०-०७-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे. सदरची माहिती त्यांनी आयोगास सादर केली.

दिनांक ०९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते. सदर सुनावणीच्या वेळी

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, आयोगाच्या निदर्शनास आलेल्या बाबी, सुनावणीमध्ये या प्रकरणी आयोगाने काढलेले निष्कर्ष व आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर केलेला युक्तिवाद व दाखल केलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय, मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, लातूर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय, मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**

**दिनांक २०-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटनुरे संतोष नागोराव, मु. गांजुर, पोस्ट रामेश्वर, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३९९

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१. श्रीमती शोयबा यास्मीन, : अपिलार्थी
रा. गुलीस्तान, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती सयदा रफीया

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद हजर व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद गैरहजर आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर होते आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की,

मागील तारखेला सुनावणी घेण्यात आली, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती १० दिवसात पुरवावयाची होती. त्यानुसार दिनांक २२-०६-२०१० रोजी अर्जदाराला महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवाच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ६ अनुसुचीची प्रत अर्जदाराला देण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या म्हणण्या-प्रमाणे त्या अभिलेखामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही, त्याची प्रत अर्जदाराला पुरविण्यात आलेली आहे. मागील वेळी माहिती देण्याचे सूचित केले होते त्याप्रमाणे माहिती दिलेली आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २०-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती शोयबा यास्मीन,रा.गुलीस्तान, फाजिलपुरा,औरंगाबाद-४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४००

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक लक्ष्मणराव कवटिकवार,<br>' अक्षय निवास, ' घ. नं. ३१ रामनगर हाऊसिंग सोसायटी,<br>हनुमानगड रोड, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा,<br>तालुका लोहा, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा, तालुका लोहा,<br>जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड हजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आयोगाच्या दिनांक ०९-०६-२०१० रोजीच्या सुनावणीनंतर अर्जदारास आवश्यक असलेली माहिती दिनांक १२-०६-२०१० रोजी श्री. एस. एच. पोटपलेवार व श्री. एम. टी. चव्हाण या कर्मचा-यांसमक्ष देण्यात आलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती मिळालेली आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक लक्ष्मणराव कवटिकवार, ' अक्षय निवास, ' घ. नं. ३१ रामनगर हाऊसिंग सोसायटी, हनुमानगड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०१

निर्णय दिनांक २०-१०-२०१०

१ श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, : अपिलार्थी
दिवाणी न्यायालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी
वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ,
तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**निर्णय**

सदर प्रकरणात अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड हजर व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड गैरहजर आहेत.

या प्रकरणात दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी लेखी जबाब सादर केले आहेत व त्यात ही बाब स्पष्ट केली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २३-०६-२०१० रोजी टपालाने पाठविण्यात आलेली आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २०-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, दिवाणी न्यायालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७५

सुनावणी दिनांक २१-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. डिघुळे प्रल्हाद देवीदास,<br>मु. पो. भालगाव, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, अभिलेख कक्ष, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगासमोर त्यांना काय पाहिजे याचे स्पष्टीकरण दिले. तसेच दोन अर्ज दिले. जन माहिती अधिकारी यांनी ते पाहिले व त्या दोन अर्जात नमूद केलेल्या बाबी देता येईल असे आयोगासमोर सांगितले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात जी माहिती मागितली आहे ती माहिती ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस द्यावी. मूळ अर्जात नमूद केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांचा संभ्रम दूर होण्यासाठी अपिलार्थीने दोन अर्ज आज रोजी दिले आहेत ते जन माहिती अधिका-यांनी ताब्यात घेतलेत.

वरील बाबी लक्षात घेता राज्य माहिती आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य नोंदणीकृत टपालाव्दारे पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २१-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. डिघुळे प्रल्हाद देवीदास, मु. पो. भालगाव, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७६

सुनावणी दिनांक २१-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम,<br>रा. दाना बाजार, जालना | : | अपिलार्थी | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तहसील कार्यालय, जालना | : | प्रतिवाद | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना | : | | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असे सांगितले की, या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपिलाची सुनावणी झालेली नाही. तसेच दिनांक १४-०६-२०१० रोजीच्या सुनावणीचे पत्र त्यांना मिळाले नाही, त्यामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही. आज रोजी प्रतिवादी गैरहजर आहेत. प्रकरणात अपिलार्थीने दिनांक २४-११-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागितली आहे व ती माहिती अद्याप अपिलार्थीस मिळालेली नाही, माहिती प्रलंबीत दिसत आहे त्यामुळे बाब गंभीर झालेली आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक असल्याने या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१०-२०१०**

**( दी. बा. देशपांडे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, रा. दाना बाजार, जालना

२ जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७७

सुनावणी दिनांक २१-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. ताहेरोद्दीन नसीमोद्दीन मोहतसीब,<br>रा. भालदारपुरा, बीड | : | अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तलाठी, सजा पात्रुड, तालुका माजलगांव,<br>जिल्हा बीड | : | प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव,<br>तालुका माजलगांव, जिल्हा बीड | : | : | अनुपस्थित |
| | त्रयस्थ पक्ष : श्री. असरार अहेमद | | | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०५-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये " फेर क्रमांक ६२५५ मौजे पात्रुड, ता. माजलगाव, जि. बीड येथील सर्वे नंबर २३२, २३३ व २३४ असरार अहेमद यांनी फेर संबंधी दिलेल्या लेखी अर्जाची प्रत, अदलाबदल पत्राची प्रत, नोटीस बजावणी होऊन आलेल्या नोटीसची प्रत, नोटीस पाठविलेल्या आवक जावक रजिस्टरची प्रत या सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती" अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका तत्कालीन तलाठी श्री. एम. एन. बनसोडे यांच्याकडून त्यांनी चार्ज घेतेवेळी मिळाली नसल्याचे त्यांना कळविले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी

प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

दिनांक १४-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे आणि त्यांना विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल संबंधितांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

या प्रकरणाशी संबंधित सध्याचे जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर अनुपस्थित आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बनसोडे यांनी दिनांक १४-०६-२०१० रोजी असा युक्तिवाद केला की, तहसीलदाराने दिनांक २२-०१-२००९ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील मंजूर केल्यानंतर त्यांनी लागलीच दिनांक ११-०२-२००९ रोजी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहिती पाठविली असून, त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगची प्रत आयोगास दाखविली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या मुद्यांसदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील नोटीस बजावणी होऊन आलेल्या नोटीसची प्रत व नोटीस पाठविलेल्या आवक जावक रजिस्टरची प्रत ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. कारण त्यांनी हे फेरफार करताना नोटीस न काढता जाहिरनामा काढला होता आणि त्या जाहिरनाम्याची प्रत ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर बजावली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांच्याकडे तयार आहे व त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पूर्वीच पाठविली असून आता परत ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील नोटीस बजावणी होऊन आलेल्या नोटीसची प्रत व नोटीस पाठविलेल्या आवक जावक रजिस्टरची प्रत ही माहिती अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती मूळात अस्तित्वात नसल्याने व या प्रकरणी संबंधित तलाठ्याने अशा प्रकारची कोणतीही नोटीस न काढता जाहिरनामा काढला असल्यामुळे, त्यांना प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती संबंधित जन माहिती अधिकारी श्री. बनसोडे यांनी आयोगास दाखवली असून ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, श्री बनसोडे यांनी आयोगास दाखविलेल्या अदलाबदल पत्राच्या प्रतीवरील सही त्यांच्या वडिलांची नसून ती दुसऱ्या व्यक्तीने केली आहे. या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे

ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार देण्याबाबत कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे आता अपिलार्थीस जी माहिती देतील त्या माहितीवर त्यांचे जर अशाप्रकारचे आक्षेप असतील तर त्यांनी महसूल विभागाच्या किंवा अन्य इतर समक्ष प्राधिकरणाकडे या गाऱ्हाण्याची तड लावून घ्यावी. तसेच या बाबतीत जर संबंधित तलाठी यांच्याकडून काही अनियमितता झाल्या असतील तर या संदर्भात ते संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठ कार्यालयास आवश्यक त्या प्रशासकीय कार्यवाहीसाठी संपर्क साधू शकतील.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे दुष्ट हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कोणतीही कारवाई करण्याची विनंती आयोग आदेशित करीत नाही.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत प्रमाणित करुन ती विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत प्रमाणित करुन ती व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( दी. बा. देशपांडे )** |
| **दिनांक २१-१०-२०१०** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१ श्री. ताहेरोद्दीन नसीमोद्दीन मोहतसीब, रा. भालदारपुरा, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा पात्रुड, ता. माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७८

सुनावणी दिनांक २१-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रणजीत नामदेव चव्हाण,<br>मु. पिंपरखेड, पोस्ट हिवरा, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | अपिलार्थी | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | | | अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही हजर नव्हते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ शी संबंधित माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात ती माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया

अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे कारण अथवा त्यांचे वैयक्तिक अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलचे कारण व स्पष्टीकरण देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील या दोन मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, ती वर दिलेल्या कारणामुळे अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होत नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित ३ मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज आणि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी या संदर्भात केलेला प्रथम अपील अर्ज हा तहसील कार्यालय, आष्टी यांच्याकडे अनुक्रमे दिनांक ०२-०६-२००८ व ०७-०८-२००८ रोजी प्राप्त झाला असल्याचे या अर्जांच्या प्रतीवरील त्यांच्या कार्यालयाच्या शिक्क्यावरुन व संबंधित लिपिकाच्या स्वाक्षरीवरुन दिसून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्या दिवशी प्राप्त होऊनही त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन एक प्रकारे त्यांना माहिती देण्याचे नाकारले असल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देण्याच्या कृतीद्वारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, आष्टी, जिल्हा बीड (नायब तहसीलदार, आष्टी या पदावर दिनांक ०२-०६-२००८ पासून पुढे ३० दिवसापर्यंत कार्यरत असलेले अधिकारी) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.	सचिव (महसूल) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन नायब तहसीलदार, आष्टी, जिल्हा बीड (नायब तहसीलदार, आष्टी या पदावर दिनांक ०२-०६-२००८ पासून पुढे ३० दिवसापर्यंत कार्यरत असलेले अधिकारी) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**		**( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक	२१-१०-२०१०**		**राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. रणजीत नामदेव चव्हाण, मु. पिंपरखेड, पोस्ट हिवरा, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आष्टी, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७९

सुनावणी दिनांक २१-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. काजी अजगरखाँ हयातखाँ,<br>मु. पो. खंडाळा, तालुका जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली,<br>तालुका जिल्हा हिंगोली | : | प्रतिवादी | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल),<br>उपविभागीय कार्यालय, हिंगोली | : | | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळीही अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही हजर नव्हते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १९.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांच्याकडील दि. २०.१०.२००८ रोजीच्या R.o.R.No. Nil/०8 या प्रकरणाच्या इतिवृत्ताची नक्कल मागितली होती. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही दिली नसल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीचे हे म्हणणे सिध्द होत आहे.सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.१९.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात

दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असेही आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी स्वतःहून काहीही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे सुनावणीस गैरहजर राहिले. जन अपिलीय अधिकारी यांनी लेखी स्वरुपात आदेश पारित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही तसेच आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करुनही कोणतीही माहिती पुरविली नाही. एवढेच नव्हेतर दिनांक १४-०६-२०१० रोजी व आजदेखील आयोगासमोरील सुनावणीसाठी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली हे अनुपस्थित आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत अथवा त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपातही मांडले नाही किंवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनाद्वारे ते या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांनी अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (दि. १९.११.२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसांपर्यंत कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी )यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

२. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (दि. १९.११.२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसांपर्यंत कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी )यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. काजी अजगरखाँ हयातखाँ, मु. पो. खंडाळा, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली, तालुका जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उपविभागीय कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८०

सुनावणी दिनांक २१-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गजानन सुभानराव लोमटे,<br>मु. पो. चुंचा व्हाया-हदगांव, तालुका कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी : उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी गैरहजर होते व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर अपिलार्थी यांना माहिती दिली आणि अपिलार्थीने ती स्वीकारली आहे. या प्रकरणी सन २००८ पासून अपिलार्थीने माहिती मागितली असता ती फार विलंबाने दिली गेली आहे. याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी या झालेल्या

विलंबाबाबत चौकशी करावी आणि या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी शिफारस त्यांना करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत चौकशी करावी आणि या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी हे दोषी आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी शिफारस त्यांना करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २१-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गजानन सुभानराव लोमटे, मु. पो. चुंचा व्हाया-हदगांव, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०८१

सुनावणी दिनांक २१-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश लक्ष्मणराव कुद्रे,<br>श्री. बाबुराव लक्ष्मणराव वाघमारे यांचे घर,<br>विजयनगर (दगडापूर), पो. चिंचाळा,<br>तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड,<br>तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड,<br>तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड | : | : अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| २ | त्रयस्थ पक्ष | : | धनलक्ष्मी - के. एन. ढाणकीकर, श्री. अब्दुल हमीद अ. नबी, सोनी - श्री. जयप्रकाश | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०३-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष श्री सोनी जयप्रकाश उपस्थित होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे बदलते

असे आहे. प्रत्येक विक्रेत्याला देण्यात येणारे रॉकेलचे परिमाण हे कालानुरुप बदलत असते. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे त्या कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही तो त्यांनी करणे आवश्यक होते. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात कोणतीही माहिती देय होत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एका महिन्याच्या कालावधीकरिता त्यांच्याकडे एकत्रित करुन ठेवली आहे व ती माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार असल्याचे दिनांक १४-०६-२०१० रोजीच्या सुनावणीमध्ये सांगितले होते. याची नोंद आयोगाने घेतलेली आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांच्याकडे तयार असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांच्याकडे तयार असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे )**

**दिनांक २१-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश लक्ष्मणराव कुद्रे, श्री. बाबुराव लक्ष्मणराव वाघमारे यांचे घर, विजयनगर (दगडापूर), पो. चिंचाळा, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४०२

सुनावणी दिनांक २१-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामचंद्र मारुती कांबळे,<br>वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कसई,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | प्रतिवादी : अनुपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,<br>तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०८-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे आणि आयोगास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती केली आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक ०९-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळीही अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही उपस्थित नव्हते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे अनिवार्य आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीचा आवाक हा मोठा आहे आणि त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम कलम ७ (९) मधील तरतूद विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस पत्राव्दारे तसेच

व्यक्तिशः संपर्क साधून अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०५-२००९ च्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने विनामूल्य पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती अपिलार्थीस पाहण्याकरिता कार्यालयीन वेळेमध्ये संपूर्ण एक आठवडा उपलब्ध करुन द्यावा. याबाबतचे त्यांना पत्राव्दारे नोंदणीकृत टपालाने कळविण्यात यावे.

उपरोक्त प्रकरणी आयोगापुढे आलेल्या आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे तसेच अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास व अपील अर्जास माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांनी कशा प्रकारे प्रतिसाद दिला हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. यासंदर्भात आपला युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती विचारात घेणे शक्य होत नाही.

वरील बाबी लक्षात घेता राज्य माहिती आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस पत्राव्दारे तसेच व्यक्तिशः संपर्क साधून अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०५-२००९ च्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने विनामूल्य पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी. सदरची माहिती अपिलार्थीस पाहण्याकरिता कार्यालयीन वेळेमध्ये संपूर्ण एक आठवडा उपलब्ध करुन द्यावा. याबाबतचे त्यांना पत्राव्दारे नोंदणीकृत टपालाने कळविण्यात यावे.

**औरंगाबाद** — **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २१-१०-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रामचंद्र मारुती कांबळे, वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कसई, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४२४

निर्णय दिनांक २१-१०-२०१०

१ श्री. रणजीत हरीभाऊ मनोरे, : अपिलार्थी
रा. रेल्वे स्टेशन, जहागिरदार कॉलनी, मुजीब सर्व्हीसींग
सेंटरच्या बाजूला, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सह मुख्य वनसंरक्षक, मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक
कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), प्रादेशिक
कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विभागीय वन अधिकारी (नियोजन), मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, मागील दिनांक १५-०६-२०१० रोजीच्या सुनावणीमध्ये देखील आयोगाने या प्रकरणात ३० दिवसाच्या आत अर्जदाराला माहिती देण्याबाबत सूचित केले होते. आज जवळपास ४ महिने होऊन गेले तरी सुध्दा पूर्ण माहिती दिलेली नाही. अपिलार्थी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, औरंगाबाद व परभणी विभागाची माहिती मिळाली आहे. मात्र उर्वरित माहितीबाबत मागील सुनावणीनंतर कोणताही पत्रव्यवहार करण्यात आला नाही अथवा माहितीही देण्यात आलेली नाही. नांदेड, बीड व उस्मानाबाद या तीन जिल्ह्यांची माहिती अजूनही देणे बाकी आहे. नांदेड विभागातर्फे सांगण्यात आले की, बघण्यासाठी माहिती उपलब्ध करुन देतो. उस्मानाबाद विभाग यांच्या म्हणण्यानुसार अर्जदारास माहिती निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. सबब जन माहिती अधिकारी नांदेड यांच्याकडे दिनांक १५ नोव्हेंबर रोजी, जन माहिती अधिकारी उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक २२ नोव्हेंबर रोजी व जन माहिती अधिकारी बीड यांच्याकडे दिनांक २९ नोव्हेंबर २०१० रोजी सकाळी ११-०० वाजता अर्जदार माहितीसाठी जातील. त्यांना वरील जिल्ह्यातील तीनही अधिकारी मूळ कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देतील. त्यातील अर्जदारास ज्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती पाहिजे त्या विनामूल्य पुरवतील. त्यातील एम. बी. च्या प्रती सोडून इतर कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती पुरविण्यात याव्यात. यानंतरही अर्जदाराला माहिती न मिळाल्यास अर्जदार माहिती अधिकार अधिनियम कलम १८ नुसार राज्य माहिती आयोगाकडे तक्रार करु शकतील.

वरील सर्व बाबी पाहता हे सिध्द झाले आहे की, अर्जदाराला आजपर्यंत संपूर्ण माहिती मिळालेली नाही. या संपूर्ण प्रकरणात अर्जदाराला जो आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास झाला आहे त्यासाठी अर्जदाराला सार्वजनिक प्राधिकरण मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद हे आजपासून ६

(सहा) आठवड्याच्या आत ५००० रुपये नुकसानभरपाई देतील. अर्जदाराला ही नुकसानभरपाई न मिळाल्यास अर्जदार तक्रार करु शकतील.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रणजीत हरीभाऊ मनोरे,रा. रेल्वे स्टेशन, जहागिरदार कॉलनी, मुजीब सर्व्हीसींग सेंटरच्या बाजूला, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४२५

निर्णय दिनांक २१-१०-२०१०

१ श्री. विनोद वसंत साळी, : अपिलार्थी
रा. घर क्रमांक २४, पोलीस कॉलनी, कन्नड, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संचालक /पोलीस अधीक्षक (अ. मु.), अं. मु. के.
गुन्हें अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी हजर होत्या आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ अपिलाची सुनावणी घेतली आणि मूळ अर्जातील मुद्यांपैकी फक्त ५% इतकीच माहिती दिली व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते कोर्टाकडून किंवा सरकारकडून का घेत नाही असे तोंडी सांगून त्यांनी माहिती देण्याचे टाळले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील ' अंगुली मुद्रा केंद्रातील ११ व्यपगत पदे पुनर्जिवीत करुन भरणे ' या विषयावर एकूण १८ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रशासकीय गोपनीयतेच्या कारणास्तव नाकारल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०६-२००९ रोजीच्या आदेशाद्वारे आपला निर्णय पारित केला. सदरचा निर्णय म्हणजे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त आहे. या निर्णयामध्ये अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले आणि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावरही प्रत्येक मुद्याबाबत त्यांचे अभिप्राय व्यक्त केले आहेत. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५०/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आणि अपिलार्थीस त्यांनी काही माहिती पुरविली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

अपिलार्थीने दिनांक १५-०६-२०१० रोजी असा युक्तिवाद केला की, त्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त ५, ६ पानांची माहिती प्राप्त झालेली आहे आणि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या शंका विचारल्या होत्या त्या शंकांचे निरसन त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये होत नाही. त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहितीची मागणी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०९-०६-२००९ रोजी त्यांच्याकडून ५०/- रु. इतक्या माहितीपोटीचे शुल्क स्वीकारुन आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली एकूण १८ मुद्यांवरील माहिती ही विस्तृत प्रमाणात आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे 'अ' व 'ब' असे दोन भाग केले असून, मुद्दा 'ब' मध्ये १७ उप भाग केले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अत्यंत त्रोटक स्वरुपात काही माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध

आहे त्या कागदपत्राच्या प्रती त्यांनी अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे ही प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "अ" द्वारे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देय आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्या कार्यालयातील अंगुली मुद्रा केंद्रातील ११ व्यपगत पदे पुनर्जिवित करुन भरण्याबाबत त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या नस्तीतील सन २००६ ते ०८ या कालावधीतील सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस आता विनामूल्य पुरवाव्यात. मुद्दा क्रमांक "ब" मधील उप मुद्दा क्रमांक १, ३, ९, १२, १३, १५, व १६ या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय नाही. कारण ती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या शंकांचे निरसन आणि त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्यांवरील माहिती देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "ब" मधील उप मुद्दा क्रमांक २ द्वारे, जन माहिती अधिकारी यांच्या शासकीय कार्यालयांचा कारभार कसा केला जातो या बाबतची माहिती मागितली आहे. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावर माहिती देताना त्यांच्या कार्यालयाचा कारभार ज्या तरतूदी आधारे केला जातो त्या संबंधित कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे, अपिलार्थीने अंगुली मुद्रा केंद्रातील ११ रिक्त पदांची भरती करण्याचे आदेश त्यांना जन माहिती अधिकारी यांना ज्या शासन निर्णयाद्वारे प्राप्त झाले त्या शासन निर्णयाची प्रत मागितली आहे, ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे भाग आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ द्वारे अपिलार्थीने स्वतःच्या परिपत्रात तयार करुन एकूण ८ मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून परत माहिती मागितली आहे. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती परिपत्राच्या स्वरुपात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत नाही. तथापि या परिपत्रातील रकान्यामध्ये अपिलार्थीने जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्या मुद्यांवर अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांना आता माहिती द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ द्वारे अपिलार्थीने, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २८-०९-२००७ रोजी घेतलेल्या ४३ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या प्रती मागितल्या आहेत. मुख्य सचिव बैठकीच्या कार्यवृत्ताच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे ज्यावेळी केला त्यावेळी उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे या मुद्यावर माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयात अगर उप विभागाच्या सचिव कार्यालयात पाठवून देऊन त्याची प्रत अपिलार्थीस देणे अधिनियमातील कलम

६ (३) (एक) प्रमाणे अपेक्षित होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांना या मुद्यासंदर्भात असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या मुख्य सचिवांच्या दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या ४३ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या प्रती संबंधितांच्या-कडून प्राप्त करुन घेऊन नंतर त्या अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व ८ द्वारे एकाच स्वरुपाची माहिती मागितली आहे. या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाने - इतक्या साली शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या संदर्भावर विहित कालावधीमध्ये कार्यवाही करण्याबाबत जो अधिनियम केला आहे त्या अधिनियमाची प्रत त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती म्हणून त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० च्या संदर्भात वरील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात आयोगाने सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी. मुद्दा क्रमांक ११ च्या संदर्भात, अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाचे अधीक्षक श्री. कलशेट्टी यांनी उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या शपथपत्राची प्रत आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली, ही प्रत त्यांना आता अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १४ व १७ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती स्पष्ट आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००६ ते ०८ असा आहे. त्यामुळे या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रिक्त पदाद्वारे भरती करण्याची जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची होती त्यांची नावे व पदनामे व बदली झाली असल्यास ते सध्या कार्यरत असलेले ठिकाण जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावे लागेल. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या बिनतारी संदेश संदर्भातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्याच्या सर्व पृष्ठांच्या प्रती त्यांना अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक "अ"व "ब" मधील उप मुद्दा क्रमांक २, ४, ५, ६, ७, ८, १०, ११, १४ व १७ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी. पुरविण्यात येणारी माहिती जवळपास ३० ते ४० पाने असून ही माहिती पोस्टाने पाठविण्याचा खर्च ५० रुपये हा अर्जदाराने माहितीच्या शुल्कापोटी भरलेले शुल्क हे टपाल खर्चासाठी वापरावे व अर्जदाराला विनामूल्य माहिती पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

३. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विनोद वसंत साळी, रा. घर क्रमांक २४, पोलीस कॉलनी, कन्नड, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा संचालक/पोलीस अधीक्षक (अ. मु.), अं. मु. के. गुन्हें अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४२७

निर्णय दिनांक २१-१०-२०१०

१ श्री. जायभाये दत्ता संभाजीराव, : अपिलार्थी
मु. दत्तनगर, पो. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
सहायक वनसंरक्षक (जंकासं) कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक वनसंरक्षक (जंकासं), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही हजर नाहीत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हे हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असण्याचे संभवत नाही. कारण त्यांच्या विभागाच्या प्रचलित कार्यप्रणालीमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रातील फर्निचर मार्टची माहिती उदाहरणार्थ नावे, परवाने ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ठेवली जात नाही अथवा असे फर्निचर मार्टचे परवाने देण्याचे अधिकार जन माहिती

अधिकारी यांना नाहीत. त्यामुळे सहाजिकच अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणार नाही. तथापि त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही किनवट व गोकुंदा येथील वन विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्याने स्पष्ट केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे ही माहिती असणे अपेक्षित आहे. या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क देखील कळविले आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाद्वारे भरुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून केवळ आवश्यक त्या अनुदानाच्या अनुपलब्धतेमुळे माहिती प्राप्त होऊ शकली नाही, ही बाब वन विभागाच्या प्रशासनाला लाजिरवाणी आहे. परंतु वन विभागाची अशा प्रकारची कार्यपध्दती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीशी कशा प्रकारे विसंगत आहे हे देखील या उदाहरणावरुन स्पष्ट होत आहे. आयोगाकडे वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या द्वितीय अपील अर्जावर निर्णय देताना वन विभागाच्या बाबतीत आयोगास असे आढळून आले आहे की, त्यांच्या विभागातील क्षेत्रिय पातळीवरील अधिकारी हे अर्जदारांना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क चलनाद्वारे शासकीय कोषागारात/ बँकेत भरण्याचे सूचित करतात व तदनंतर या चलनाची मूळ प्रत अर्जदाराने वन विभागातील अधिकाऱ्यांना सादर केल्यानंतर केवळ अनुदान उपलब्ध नाही म्हणून वन विभागाच्या क्षेत्रिय पातळीवरील जन माहिती अधिकारी हे कायम अर्जदारांना माहिती नाकारत असतात. या संदर्भात सचिव (वने) यांनी स्वतः लक्ष घालून, अर्जदारास अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीने या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरल्यानंतर ती कशा प्रकारे पुरविता याचे मार्गदर्शन करणारे प्रपत्र त्यांच्या स्तरावरुन जारी करावे अशा सूचना त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) प्रमाणे देण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्यामुळे त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. जर अपिलार्थीस माहिती देण्याकरिता लागणाऱ्या खर्चाइतके अनुदान उपलब्ध नसेल तर त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एका कोऱ्या कागदावर लिखीत स्वरुपात ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी वरील कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीने भरुनही अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. वाय. भंडारी यांनी

कोणताही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (वने) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

५. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

७. सचिव (वने) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एस. वाय. भंडारी (सध्या वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो), किनवट या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची व वरील निर्णयाप्रमाणे सूचना देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २१-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जायभाये दत्ता संभाजीराव, मु. दत्तनगर, पो. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकासं), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (वने), वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४२८

निर्णय दिनांक २१-१०-२०१०

१ श्री. पंढरीनाथ नामदेवराव जटाळे, : अपिलार्थी
जिल्हा परिषद शाळेपुढे, वसरणी, पो. सिडको,
तालुका जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक
कार्यालय, औरंगाबाद (ग्रामीण)

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक
कार्यालय, औरंगाबाद (ग्रामीण)

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक (गृह), जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, औरंगाबाद (ग्रामीण)

जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण)

त्रयस्थ पक्ष : श्री. व्ही. एन. जटाळे, सौ. शेषाबाई नामदेव जटाळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०९.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आणि जन माहिती अधिकारी आणि त्रयस्थ पक्षांपैकी श्री. व्ही. एन. जटाळे हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण) यांनी अपिलार्थीला असे कळविले आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही कौटुंबिक स्तरावरील खाजगी बाब असून या माहितीचा सार्वजनिक बाबीशी

काहीएक संबंध नाही. सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करता आयोग खालील निर्णयाप्रत आला आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पंढरीनाथ नामदेवराव जटाळे, जिल्हा परिषद शाळेपुढे, वसरणी, पो. सिडको, तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (गृह), जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, औरंगाबाद (ग्रामीण) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४२९

निर्णय दिनांक २१-१०-२०१०

१ श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे, : अपिलार्थी
रा. पो. कुपटी (मा), तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा अनंतवाडी,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दि. १८-०५-२०१० रोजी म्हणजेच त्यांनी आयोगाकडे दि. ०४-०९-२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर व्यक्तिशः प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस अपेक्षित माहिती मिळाल्याची कबूली त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात दिली आहे. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कधी गेले होते, यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही अथवा त्यांचे म्हणणे मौखिक स्वरुपात मांडण्यासाठी ते आज

रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २१-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेषेराव एकनाथ टेकाळे, रा. पो. कुपटी (मा), तालुका माहूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा अनंतवाडी, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३०

निर्णय दिनांक २१-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीपाल अशोकराव बस्तापुरे,<br>रा. रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पळशी,<br>तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,<br>रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविणाऱ्या पत्राचे अवलोकन करता त्यामध्ये अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस कळविण्यात येणाऱ्या शुल्काचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. प्रत्येक जन माहिती अधिकाऱ्यास अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा तपशील अर्जदारास देणे अनिवार्य आहे. या प्रकरणी असा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिला नसल्यामुळे त्यांना आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी लागेल.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, या अर्जामध्ये अपिलार्थीने, "........... विवरणपत्र प्रसिध्द केले काय?" अशा प्रकारची माहिती जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी प्रसिध्द केलेल्या विवरणपत्राची प्रत ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २१-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्रीपाल अशोकराव बस्तापुरे, रा. रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पळशी, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, रेणापूर, तालुका रेणापूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३१

निर्णय दिनांक २१-१०-२०१०

१ श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, : अपिलार्थी
रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. सय्यद खलील

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष गैरहजर होते व जन माहिती अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात अपिलार्थीने सादर केलेले दिनांक २९-०९-२०१० व दिनांक ३०-०९-२०१० रोजीचे निवेदन व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीपैकी ज्या माहितीने समाधान झाले नाही व ती माहिती ज्या मुद्यांशी संबंधित आहे, त्या मुद्यांचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ द्वारे 'त्रयस्थ पक्ष श्री. सय्यद खलील हे दि. १८.०१.२००९ रोजी मस्टरवर सही करुन दुपारपासून कार्यालयात आले

नाहीत, हे कर्मचारी कार्यालय सोडून कोठे होते', मुद्दा क्र. ६ द्वारे, 'सदर कर्मचारी, श्री. सय्यद खलील दि. १८.०१.२००९ रोजी किती रुपये कर वसूल केला', मुद्दा क्र. ७ द्वारे, 'त्यांनी केलेल्या कर वसूलीचा पावती क्र. व मुद्दा क्र. ११ द्वारे, 'सदर कार्यवाही कोणत्या तारखेपर्यंत करणार आहेत', अशी माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, या मुद्यांवरील माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या या मुद्यावरील माहितीपैकी मुद्दा क्र. ५ व ११ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, कारण अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची नसून, कर्मचारी काही वैयक्तिक कारणास्तव कार्यालय सोडून गेले असता ते नेमके कोणत्या ठिकाणी गेले, याची माहिती नगर परिषदेकडे कोणत्याच स्वरुपात ठेवली जात नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामधील या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्र. ११ व्दारे, 'कार्यवाही कोणत्या तारखेपर्यंत करणार आहे', अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. सदर मुद्याची माहिती भविष्यकाळातील असून अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे भविष्यकाळातील माहिती वर्तमानकाळात उपलब्ध होऊ शकणार नाही. त्यामुळे याही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने मुद्दा क्र. ८ द्वारे, 'त्रयस्थ पक्ष श्री. सय्यद खलील यांनी दि. १८.०१.२००९ रोजी वसूल केलेला कर आणि वसूली पावतीचे क्रमांक' अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. तथापि 'सदरच्या कर्मचाऱ्याकडे वसूली पावत्या फाडण्याचे काम नाही', अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी कळविली आहे. त्यामुळे या मुद्यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त झाली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. श्री.सय्यद खलील हे वसूली लिपीक नसल्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी कोणताही कर वसूल केला नाही. त्यामुळे वसूली केलेल्या पावतीची माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केले. हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५,६,७,११ या मुद्यांवरील माहिती दिल्याचे दिसून येत आहे. परंतु अपिलार्थीस ही माहिती खोटी का वाटत आहे, याचे कोणतेच स्पष्टीकरण अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती दिल्याचा दुसरा एक आक्षेप आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेला आहे. तथापि या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्त्व अर्जदाराचे असते. या प्रकरणी हे उत्तरदायित्त्व अपिलार्थीने कोणत्यारितीने पार पाडले, याचा पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तसेच अशा प्रकारचा पुरावा दाखविण्यासाठी किंवा तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीने आयोगाकडे

केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या कारणांमध्ये कोणताही तथ्यांश आढळून येत नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २१-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, रा. दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२८०

निर्णय दिनांक २१-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील तानाजी रामचंद्र,<br>मु. पो. काक्रंबा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दिनांक ०१-११-२००८ रोजी प्राप्त झालेले व औरंगाबाद कार्यालयाकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १४-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही हजर नव्हते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगास सांगितले तसेच याबाबतचा पुरावाही सादर केला. अपिलार्थीने अपील अर्जावर समक्ष माहिती मिळाली असे लिहून दिले आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना इतका विलंब का लागला याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी चौकशी करावी आणि योग्य वाटल्यास संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंग विषयक कारवाई करावी.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २१-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पाटील तानाजी रामचंद्र, मु. पो. काक्रंबा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४५

निर्णय दिनांकः २२.१०.२०१०

१ श्री. प्रल्हाद किसनराव तौर, : अपिलार्थी
जनसेवा हॉस्पिटल, महाराष्ट्र व्दारजवळ, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात मागील दि. १६.०६.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अर्जदार,जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते.

सदर प्रकरणात आज सुनावणी ठेवण्यात आली आहे.अर्जदार अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,घनसावंगी, जि.जालना, श्री. पाटील राहुल मधुकर हे उपस्थित आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणात अर्जदाराला दि. ०१.१०.२०१० रोजी पोस्टाद्वारे माहिती पाठविण्यात

आलेली आहे. वास्तविक पाहता अर्जदार अपिलार्थी यांनी प्रपत्र-'अ' नुसार दि.३०.०९.२००८ रोजी जी माहिती मागितली होती, ती व्यक्तिशः मागितली आहे. तसेच या प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याद्वारे प्रथम अपिलात दि. १७.११.२००८ रोजी सकाळी ११.०० वा. तहसील कार्यालयामध्ये प्रपत्र-'ब' नुसार सुनावणी ठेवण्यात आली होती, परंतु प्रथम अपिलीय अधिकारी हे शासकीय दौऱ्यावर असल्यामुळे सदर तारीख दि.२६.११.२००८ रोजी ठेवण्यात आली. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणात प्रथम अपील हे निकाली काढलेले दिसत नाही. त्यामुळे तांत्रिकदृष्टया द्वितीय अपील चालवता येत नसले तरी अर्जदाराने किती दिवस वाट पहावयाची हा देखील एक प्रश्न आहे.

अर्जदार यांनी द्वितीय अपील दि. ०३.०२.२००९ रोजी दाखल केलेले आहे व त्यात प्रथम अपिलावर दोन वेळेस सुनावणीची वेळ देऊनही तारीख वाढविण्यात आली व सुनावणी झालेली नाही व माहिती अद्यापही मिळालेली नाही, असे नमूद केलेले आहे, ही बाब जरी सत्य असली तरी आज रोजी नायब तहसीलदार यांनी अर्जदाराला दि. ०१.१०.२०१० रोजी पोस्टाद्वारे माहिती पाठविल्याचे सांगितले आहे, परंतु अर्जदाराला माहिती मिळालेली आहे किंवा कसे, हे अर्जदार आज रोजी सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे समजून येत नाही.

या अधिनियमाच्या कलम १९(३) नुसार प्रथम अपिलात दोनही बाजूचे म्हणणे ऐकूण माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात निर्णय घेण्याची जबाबदारी ही सुध्दा प्रथम अपिलीय अधिकारी यांची आहे. परंतु सदर प्रकरणात अर्जदाराला प्रथम अपिलाच्या सुनावणीची तारीख देऊनसुध्दा अपील घेतले नाही तर याबाबतीत असे सूचित करण्यात येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराला सुनावणीची नोटीस काढून हे आदेश मिळाल्यापासून चार आठवडयाचे आत सुनावणी घेऊन व अर्जदाराचे तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. माहिती द्यावयास जो उशिर झालेला आहे, त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण घेऊन स्वयंस्पष्ट निर्णय द्यावा व त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार परत या आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २२.१०.२०१०**

**( भास्कर पाटील ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रल्हाद किसनराव तौर, जनसेवा हॉस्पिटल, महाराष्ट्र व्दारजवळ, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४६

निर्णय दिनांक : २२.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. परसराम नाथा पा. हजारे,<br>मु. दादेगांव (बु.), पो. हर्षी, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,<br>जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,<br>जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, विहामांडवा, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१०-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणामध्ये मागील दि. १६.०६.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सदर प्रकरणात आज सुनावणी ठेवण्यात आली आहे. आज रोजी अपिलार्थी,श्री. परसराम नाथा हजारे उपस्थित आहेत, तर जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणात झालेल्या मागील दि. १६.०६.२०१० रोजीच्या सुनावणीस हजर राहिल्यावरसुध्दा त्यानंतर अर्जदाराला माहिती दिलेली नाही, असे अर्जदाराचे म्हणणे आहे. या

प्रकरणात अर्जदाराने तालुका कृषि अधिकारी, पैठण यांनी दि. २२.०६.२०१० रोजी पत्र दिले व त्याप्रमाणे अर्जदार शुल्क भरण्यास तयार असूनसुध्दा माहिती दिली नाही व अर्जानुसार माहिती पुरवावी, असे नमुद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळीदेखील अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले, तसेच उत्तरवादी यांनीसुध्दा मागील सुनावणीच्यावेळी दाखल केलेला खुलासा व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांचा विचार करता आयोग खालील निष्कर्षाप्रत आला आहे की आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अर्जदारास दाखवावी व त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी नमुद केलेल्या पत्त्यावर हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत पंजीकृत डाकेने विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात.

तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी, असे आढळून आले आहे की, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या दि.०५.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, पैठण यांना अर्जदाराच्या अन्य दि. २८.०८.२००९ रोजीच्या तक्रारीसंदर्भात, अर्जदारास मागितलेली माहिती उपलब्ध न करुन देण्याबाबत खुलासा मागितला होता व माहिती त्वरित उपलब्ध करुन देण्यात यावी, असे सूचित केले होते. एवढे असूनसुध्दा अर्जदाराला माहिती दिलेली नाही, ही बाब सिध्द झालेली दिसते म्हणून प्रकरणात आजपर्यंत अर्जदारास झालेल्या मानसिक त्रासाबद्दल नुकसानभरपाई रु.३०००/- हे आदेश मिळाल्यापासून संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने रोख किंवा डी.डी.द्वारे देण्यात यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अर्जदाराचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणाचा निर्णय मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत संपूर्ण माहिती अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पंजीकृत डाकेने विनाशुल्क अर्जदारास पाठविण्यात यावी.

३. प्रकरणात अर्जदारास आजपर्यंत झालेल्या मानसिक त्रासाबद्दल नुकसानभरपाई रु.३०००/- हे आदेश मिळाल्यापासून संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने रोख किंवा डी.डी.द्वारे देण्यात यावी.

४. अर्जदाराला माहिती न मिळाल्यास व वरील आदेशात निर्देशित केलेली नुकसान भरपाईची रक्कम न मिळाल्यास अर्जदार या अधिनियमातील कलम १८ खाली तक्रार करु शकतात.

**औरंगाबाद**
**दिनांक २२.१०.२०१०**

**( भास्कर पाटील ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परसराम नाथा पा. हजारे, मु. दादेगांव (बु.), पो. हर्षी, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, विहामांडवा, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४७

निर्णय दिनांक: २२.१०.२०१०

१ श्री. भगवान सांडुजी गायकवाड, : अपिलार्थी

रा. ब्रिजवाडी, एमआयडीसी एरीया, चिकलठाणा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक, सम्राट अशोक विद्यालय, ब्रिजवाडी,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

जिल्हा परिषद कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१०-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणात या आधी या आयोगाने दि. १७.०६.२०१० रोजी सुनावणी ठेवली होती, त्यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री. पवार डी.बी.हे उपस्थित होते व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सम्राट अशोक विद्यालय,ब्रिजवाडी,औरंगाबाद व अपिलार्थी,श्री. भगवान सांडुजी गायकवाड अनुपस्थित होते. आज दि. २२.१०.२०१० रोजी सुनावणी घेतली असता, अर्जदार व मुख्याध्यापक, सम्राट अशोक विद्यालय, ब्रिजवाडी,औरंगाबाद

अनुपस्थित आहेत.फक्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. औरंगाबाद यांचे प्रतिनिधी कार्यालयीन अधीक्षक श्री. जी. बी.यौतीवाड व लिपीक श्री. बनकर हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी दि. १६.०६.२०१० रोजी या आयोगास नव्याने पत्र देऊन असे कळविले आहे की, अर्जदार यांनी दि. ०६.०८.२००९ रोजी १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. मुख्याध्यापक यांनी ती न दिल्यामुळे दि. २२.०८.२००९ रोजी म्हणजेच ३० दिवसांची मुदत होण्यापूर्वीच अपील अर्ज सादर केला होता. तरीही प्रथम अपिलावर सुनावणी ठेवण्यात आली होती, परंतु अर्जदार यांनी लेखी कळविले की, दि. ०३.११.२०९ रोजी  अपिलाची सुनावणी विहित मुदतीत न घेतल्यामुळे सुनावणीस हजर राहू शकत नाही. अर्जदाराने १ ते ८ मुद्यांवर मागितलेल्या माहितीपैकी काही मुद्दे शाळेशी संबंधित आहेत व काही मुद्दे शिक्षण संस्थेशी (म्हणजेच ट्रस्ट) संबंधित आहेत. तसेच शिक्षणाधिकारी यांनी या आयोगाला असे कळविले आहे की, अर्जदाराने शाळेविषयी व संस्थेविषयी माहिती मागितली आहे व शिक्षकांच्या दोन गटात अतिशय वाद चालू आहेत व ते वाद धर्मादाय उपआयुक्त यांच्याकडे प्रलंबित आहेत तसेच वादामुळे मुख्याध्यापकाचे पद भरलेले नसून ते पद रिक्त आहे. शाळेमध्ये कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नाही, तसेच या सर्व बाबींमुळे शाळेविरुध्द मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार शाळेची मान्यता रद्द करण्याची कार्यवाहीसुध्दा प्रस्तावित केलेली आहे. सदरची संस्था ही १०० टक्के अनुदानित आहे.

वरील बाबींचा विचार करता असे सूचित करण्यात येत आहे की, प्रकरणात सद्यस्थितीत मुख्याध्यापक या पदावर जे अधिकारी नोकरीत कार्यरत असतील (प्रभारी किंवा पूर्ण काळ) यांनी त्यांच्या शाळेबाबतची जी माहिती मागितली आहे, ती संपूर्ण माहिती अर्जदाराला हे आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत द्यावी व जी माहिती संस्थेशी संबंधित आहे, त्याबाबत अर्जदारास तसे कळवावे व त्यासंदर्भात परस्पर माहिती मिळविण्यासाठी अर्जदाराला अवगत करावे. सदरची प्रक्रिया हे आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसांत पूर्ण करावी.

वरील आदेश देऊन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील ),**

**दिनांक : २२.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ, औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान सांडुजी गायकवाड, रा. ब्रिजवाडी, एमआयडीसी एरीया, चिकलठाणा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सम्राट अशोक विद्यालय, ब्रिजवाडी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४८

निर्णय दिनांक: २२.१०.२०१०

१ श्री. पुंडलिक आनंदराव होरसील, : अपिलार्थी

रा. पिरबाजार, फुलेनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :
जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१०-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात मागील दि.१७.०६.२०१० रोजी सुनावणी घेतली होती. त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते तर अपिलार्थी उपस्थित होते. त्यांना पुन्हा एक संधी म्हणून आज रोजी दि.२२.१०.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अर्जदार उपस्थित आहेत तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उत्तरवादी यांनी प्रकरणातील मूळ मुद्दा असा उपस्थित केला की, अर्जदार अपिलार्थी यांचा मूळ अर्ज हा जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नव्हता, त्यामुळे माहिती देण्यात आली नाही. तो अर्ज त्यांच्या कार्यालयामध्ये आता प्राप्त झाला आहे. सुनावणीच्या दिवशी म्हणजे आज रोजी

अर्जदाराने मागितलेली माहिती विनामूल्य देण्यात आली. या माहितीने अर्जदाराचे समाधान झालेले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २२.१०.२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पुंडलिक आनंदराव होरसील, रा. पिरबाजार, फुलेनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४९

निर्णय दिनांक: २२.१०.२०१०

१ श्रीमती शोयबा यासमीन, : अपिलार्थी

रा. गुलिस्तान, फाजिलपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्याध्यापक, उर्दू माध्यमिक विद्यालय, दौलताबाद, ता. जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती रफिया शहनाज

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-१०-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज सुनावणी ठेवण्यात आली आहे. सुनावणीसाठी अर्जदार अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे सर्व उपस्थित आहेत. या प्रकरणात यापूर्वी दि. १७.०६.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यावेळी देखील अर्जदार अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे सर्व उपस्थित होते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात आली आहे, असे प्रतिपादन केले. तसेच अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दिलेली माहिती बनावट व खोटी असून, माहितीच्या अधिकारात अर्ज आल्यानंतर सदरची माहिती बनवण्यात आली आहे.

प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, ज्या माहिती अधिकाऱ्याला किंवा मुख्याध्यापकाला सुटी मंजूर करण्याचे अधिकार असतात, तो अधिकार त्यांनी केव्हा वापरावयाचा, त्यात काही अनियमितता झालेली असू शकते परंतु वरील अभिलेख्यावर दिलेली माहिती पुरविली असलीतरी अर्जदाराला त्या माहितीबद्दल आक्षेप घेता येत नाही. अर्जदारास जर आवश्यक असेल तर शिक्षणाधिकारी अथवा वरिष्ठ प्राधिकरणाकडे तक्रार करुन त्याबद्दल आक्षेप नोंदवू शकतात. या आयोगाला उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांनुसार असे निदर्शनास आले आहे की, अर्जदाराने दि. १९.०६.२००९ रोजी मूळ अर्जाद्वारे माहिती अधिकारी यांच्याकडे, 'त्रयस्थ पक्ष श्रीमती रफिया शहनाज यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्याबाबत', अशी माहिती मागितली होती. या अर्जात अर्जदार अपिलार्थी यांनी मुख्याध्यापक, ऊर्दू माध्यमिक विद्यालय, दौलताबाद ता.जि.औरंगाबाद यांना उद्देशून एक पत्रसुध्दा लिहिलेले होते व या पत्रामध्ये त्रयस्थ पक्ष संस्थेमध्ये कार्यरत असताना त्यांनी दि. १३.०७.२००५ पारपत्र बनविले व सदर पारपत्र बनविण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्राकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केला नव्हता तसेच या पारपत्राच्या आधारे त्रयस्थ पक्षाने दि. १७.०८.२००५ ते १३.११.२००५ व ५ मे, २००६ ते ३०.०६.२००६ या कालावधीमध्ये गुप्त विदेश यात्रा केली. या विदेश यात्रेची जन माहिती अधिकारी यांना कोणतीही कल्पना नाही. सदरचे कृत्य हे संशयित व देशद्रोही स्वरुपाचे आहे व त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात यावा. याबाबत अर्जदाराने त्यांच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद न दिल्यामुळे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०८.२००९ रोजी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द झालेल्या सुनावणीचे इतिवृत्त जारी केले. सुनावणीमध्ये अपिलार्थीस मुख्याध्यापकाने त्यांना त्यांच्या दि. १९.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात स्पष्टीकरण द्यावे आणि जर मुख्याध्यापक सक्षम नसतील तर त्यांनी यासंदर्भात कोणाकडे अर्ज करावा, याबाबत त्यांनी माहिती द्यावी, असे ठरविले व याबाबत मुख्याध्यापक यांनी संमती दर्शविल्याचे दिसून येते. दि.

०१.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्रयस्थ पक्ष श्रीमती रफीया शहनाझ यांना नोकरीतून काढण्यास ते असमर्थ आहेत, या माहितीसाठी त्यांच्या संस्थेकडे संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. सदर प्रकरणात या आयोगाने मागील तारीख दि. १७.०६.२०१० रोजी सुनावणी घेतली. सुनावणीच्या वेळी सर्व पक्षाचे म्हणणे ऐकून घेण्यात आले होते व त्यानंतर पुन्हा आज रोजी सदर प्रकरणात सुनावणी घेण्यात येत आहे. संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्रयस्थ पक्षाचे म्हणणे असे आहे की, अर्जदार या त्यांच्या जवळच्या नातेवाईक असून त्यांच्या घरगुती, वैयक्तिक वैमनस्यामुळे सदर प्रकरणात माहितीच्या अधिकारात माहिती मागवून अर्जदार या त्रयस्थ पक्षाला त्रास देत आहेत. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराला माहिती मागविण्याचा अधिकार आहे व कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणात अनियमितपणे गैरप्रकार चालत असतील किंवा गैरकायदेशीर कृत्य होत असतील तर त्याबाबत अर्जदारास माहिती मागवून, त्याबाबत पाठपुरावा करण्याचे अधिकार आहेत.

या अधिनियमाखाली अर्जदाराला रेकॉर्डवर उपलब्ध असलेली माहिती मिळविण्याचे अधिकार आहेत. तसेच त्या माहितीच्या आधारे अर्जदाराला जर गैरप्रकार किंवा अनियमितता आढळली असेल तर अर्जदारास संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे दाद मागून तक्रारीचे निरसन करता येते. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराला मुख्याध्यापक यांनी दिलेली व संस्थेने त्यांना दिलेली माहिती यामध्ये तफावत आढळली. परंतु मुख्याध्यापक यांनी सुटीबाबत दिलेली माहिती ही जास्त वैध आहे, असे आयोगास आढळून येते. कारण मुख्याध्यापक यांना त्यांच्या अधिनस्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कोणतीही सुटी/रजा मंजूर करावयाची किंवा नाही याबाबतचे अधिकार मुख्याध्यापक यांना आहेत. यामुळे अर्जदाराच्या अर्जासंदर्भात संस्थेकडून त्यांना मिळालेली माहिती ही तितकी ग्राहय धरता येत नाही. परंतु यामध्ये जर तफावत असेल तर अर्जदार संबंधित अधिकाऱ्याकडे तशी तक्रार करु शकतात.

सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा दि. ०५.१०.२००९ रोजी स्वयंस्पष्ट आदेश दिलेले आहेत. त्यात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपिल फेटाळण्यात

आले. अर्जदाराने मिळालेल्या माहितीच्या आधारे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानुसार त्यांना योग्य वाटेल अशी तक्रार पोलीसांकडे अथवा योग्य त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे करुन दाद मागू शकतात. त्यानंतरही योग्य ती दाद मिळाली नाही तर अर्जदार योग्य त्या न्यायालयाकडे दाद मागू शकतात.

वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदारास त्यांनी मागितलेली सर्व माहिती मिळालेली आहे. अर्जदारास ही बाब पडताळून पहावयाची असल्यास अर्जदाराला आज रोजी तपासून पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिलेली आहे.

त्रयस्थ पक्षाने असे सांगितले की, त्यांनी पारपत्र बनवून जो विदेश दौरा केलेला आहे, त्यांच्या म्हणण्यानुसार तो कायदेशीर व नियमानुसार केलेला आहे व त्याबाबत त्यांच्याकडे कागदपत्रे आहेत.

ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील ),**

**दिनांक २२.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती शोयबा यासमीन, रा. गुलिस्तान, फाजिलपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दू माध्यमिक विद्यालय, दौलताबाद, ता. जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५०

निर्णय दिनांक : २२.१०.२०१०

१ श्री. वसंत बन्शी सावंत, : अपिलार्थी
मु. पो. कुप्पा, ता. वडवणी, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक, राजेसाहेब विद्यालय, कुप्पा, ता. वडवणी,
जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१०-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात मुख्याध्यापक श्री. प्रकाश व्यंकटराव पाटील, राजेसाहेब विद्यालय,कुप्पा, ता.वडवणी,जि.बीड हे जन माहिती अधिकारी म्हणून उपस्थित आहेत. शिक्षणाधिकारी (माध्य.),जि.प.बीड यांचे प्रतिनिधी श्री. एल.के.पसलवाड, अधीक्षक हे उपस्थित आहेत. अर्जदाराला दि. १८.०६.२००९ व २८.०७.२००९ रोजी माहिती दिल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. अर्जदार अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणात मागील दि. १७.०६.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित

होते. सदर प्रकरणात कागदपत्रांची पडताळणी करुन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २२-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वसंत बन्शी सावंत, मु. पो. कुप्पा, ता. वडवणी, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजेसाहेब विद्यालय, कुप्पा, ता. वडवणी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९९६

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

१ श्री. मधुकर गंगाधरराव दिवाण, : अपिलार्थी
पवन-पुत्र, शिवाजीनगर, पाथरी, तालुका पाथरी,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
नगर परिषद कार्यालय, पाथरी, तालुका पाथरी,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पाथरी,
तालुका पाथरी, जिल्हा परभणी

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक कार्यालयीन निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. डी. बी. चिंचाणे, श्री. ज्ञानोबा शामराव बडवणे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व श्री. ज्ञानोबा शामराव बडवणे गैरहजर होते, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. डी. बी. चिंचाणे हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२००९ व दिनांक ०४-०४-२००९ रोजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी का वाटत आहे याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध अभिलेख्यावरील आवश्यक ती माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी सुध्दा जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे सांगत आहेत. सबब, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर गंगाधरराव दिवाण, पवन-पुत्र, शिवाजीनगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालयीन निरीक्षक, नगर परिषद कार्यालय, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३२

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

१ श्री. मोहमंद अन्वरउल्ला खान, : अपिलार्थी
९-४-४५५, कय्युम प्लॉट्स, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर होते व जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे उत्तरदायित्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले याचा तपशील आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास त्यांनी दिनांक २४-१२-२००८ रोजी अर्ज केल्यापासून पुढच्या ३० दिवसाच्या आत अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी उपस्थित राहिले, याचा कोणताही तपशील आयोगास दिलेला

नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली हा त्यांचा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निरंक माहिती देण्यामागची कारणे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केली आहेत. हे पाहता अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवरुन त्यांची निश्चितपणे कशी दिशाभूल झाली आहे आणि ही माहिती कशी चुकीची आहे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करताना दिलेली दोन्ही कारणे परस्पर निकाली निघत असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २२-१०-२०१०**

**( भास्कर पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहमंद अन्वरउल्ला खान, ९-४-४५५, कय्युम प्लॉट्स, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३३

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

१ श्री. विजयकुमार गुरुनाथ पवार, : अपिलार्थी
रा. सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय,
उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. सागर अरविंद मलमटे, श्रीमती चंद्रकला श्रावण सूर्यवंशी, श्री. श्रावण सूर्यवंशी, श्री. प्रभाकर रामचंद्र सोनकांबळे, श्री. मारोती पोमा पवार, श्री. श्रीपती रुपसिंग जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. मारोती पोमा पवार हजर आहेत, जन अपिलीय अधिकारी व इतर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष श्री. मारोती पोमा पवार हजर होते आणि इतर त्रयस्थ पक्ष गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सात मुद्दयांवर माहिती मागितली होती. त्यापैकी पाच मुद्दयांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-१२-२००९ रोजी पुरविली आहे. अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार त्रयस्थ पक्षाने दोन नावांनी प्रमाणपत्र काढले आहे, एक सागर अरविंद येलमटे व दुसरे अर्चना अरविंद येलमटे. जन माहिती अधिकारी यांनी

सांगितले की, त्यांनी रेकॉर्डवरील कागदपत्रानुसार प्रमाणपत्र दिले आहे. याबाबत असे सांगण्यात येते की, अपिलार्थीला याबाबत काही तक्रार असेल तर त्यांनी संबधित विभागाकडे तक्रार करावी. त्यावर संबंधित विभागाने निर्णय घेणे अपेक्षित आहे. त्यासाठी अर्जदाराने संबंधित विभागाकडे पाठपुरावा करावा. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला दोन वेळेस माहिती दिली आहे.

अर्जदाराने विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद तसेच जिल्हाधिकारी, लातूर यांना दिनांक ०७-०९-२००९ रोजी पत्र पाठवून सागर अरविंद येलमटे यांच्या प्रमाणपत्राबाबत तक्रार केली होती. याबाबतचे पत्र रेकॉर्डवर आहे. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांना दिनांक ०५-०१-२०१० रोजी पत्र पाठवून प्रकरणात आवश्यक कार्यवाही करुन अपिलार्थीस व कार्यालयास अवगत करण्याचे कळविले आहे. सबब विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, लातूर यांनी केलेली कार्यवाही अर्जदाराला अवगत करावी.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजयकुमार गुरुनाथ पवार, रा. सोमनाथपूर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (निवडणूक), तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३४

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

१ श्री. प्रभुदास सुभाष भालेराव, : अपिलार्थी
कमला-रतन प्लाझा, जे. ई. एस. कॉलेज रोड,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १५-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २५-०४-२००९ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. दिनांक १५-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी तयार करुन ठेवली होती. तथापि ज्यावेळी

अपिलार्थी त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी उपस्थित झाले त्यावेळी त्यांनी ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रभुदास सुभाष भालेराव, कमला-रतन प्लाझा, जे. ई. एस. कॉलेज रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३५

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

१ श्री. नासेर अब्दुल गणी खान, : अपिलार्थी
रा. राज कॉम्प्लेक्स, एन - १२, हडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, नुर उर्दू प्राथमिक शाळा, उस्मानपुरा,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्रीमती खान सुरय्या जमाल महेमुद खान

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १६-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते व जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०८-२००९ रोजी माहिती पुरविली आहे. अर्जदाराने पाच मुद्दयांवर माहिती मागितली होती व ही माहिती ट्रस्टशी संबंधित आहे. या आयोगाने अपील क्रमांक २००८/रामा आ/अपील/सीआर/५६५ मध्ये दिनांक १०-०६-२००९ रोजी या प्रकरणात निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ च्या संदर्भात दिनांक २८-०४-२००९ रोजी दिलेल्या निर्णयावरील अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार अपील फेटाळले आहे. त्यामुळे उत्तरवादी यांना माहितीचा अधिकार लागू होत नाही.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नासेर अब्दुल गणी खान, रा. राज कॉम्प्लेक्स, एन - १२, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, नुर उर्दू प्राथमिक शाळा, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३७

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बन्शी सखाराम शेजवळ,<br>वरिष्ठ श्रेणी लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय, औरंगाबाद<br>ग्रामीण, औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर, औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर, औरंगाबाद | : प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | पोलीस उपायुक्त (मुख्यालय) तथा परिमंडळ, औरंगाबाद |
| | त्रयस्थ पक्ष | : | १) श्री. एम. जी. देशमुख<br>२) श्रीमती विकाअनिया बेगम |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. एम. जी. देशमुख हजर व जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष श्रीमती विकाअनिया बेगम गैरहजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १६-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्रीमती विकाअनिया बेगम गैरहजर होते व जन माहिती अधिकारी, त्रयस्थ पक्ष श्री. एम. जी. देशमुख हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणात प्रथम अपील सुनावणी घेतलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१०-२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीची कागदपत्र पडताळणीची विनंती मान्य केलेली आहे. वास्तविक पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यानंतर त्यावर आपला निर्णय देणे अभिप्रेत होते. या आदेशाने अपिलार्थीचे समाधान

न झाल्यास अर्जदार ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार व्दितीय अपील करु शकतो.

अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) तथा परिमंडळ, औरंगाबाद यांनी अर्जदाराला दिलेल्या या पत्राचे अवलोकन केले असता त्यात सादर केलेल्या दिनांक ०४-१०-२००९ रोजीच्या अपिलावर दिनांक २६-१०-२००९ रोजी सुनावणी दर्शविली आहे. परंतु त्यावरुन कागदपत्रे पडताळणी करण्याची विनंती मान्य करण्यात आलेली आहे. परंतु अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ते बरोबर नाही. मूळ कागदपत्रांची पडताळणी केली तरी याबाबत वाद असल्यामुळे याची जन अपिलीय अधिकारी यांचे समक्ष पडताळणी करावी अशी अर्जदाराची तक्रार आहे. तसेच अर्जदार यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात बरोबर वागणूक देण्यात आलेली नाही व माहितीही देण्यात आलेली नाही. तसेच अर्जदाराने लेखी निवेदन दिले आहे त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांना देण्यात आली आहे. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावे व यावर समाधान न झाल्यास अर्जदार ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार व्दितीय अपील करु शकतील.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बन्शी सखाराम शेजवळ, वरिष्ठ श्रेणी लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय, औरंगाबाद ग्रामीण, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय) तथा परिमंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४३९

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दत्तु ईराप्पा दिंडे,<br>मु. पो. आडूळ, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | सहायक प्रकल्प अधिकारी (पाणलोट), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १६-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अपिलार्थीस दिनांक २९-०६-२०१० रोजी माहिती दिल्याचे आणि अपिलार्थीकडून त्याप्रमाणे माहिती मिळाल्याचे लिहून घेतल्याचे सांगितले. तसेच याबाबत झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. त्यामुळे अपिलार्थीस माहिती मिळाल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**

**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तु ईराप्पा दिंडे, मु. पो. आडूळ, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी (पाणलोट), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४०

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

१ श्री. इलियासखान पिता अब्दुल मजीदखान, : अपिलार्थी
औरंगाबाद-जालना हायवे रोड, बदनापूर, तालुका बदनापूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा संचालक (माहिती) माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मराठवाडा विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १६-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरण आज रोजी पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे. प्रकरणात आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २२-१०-२०१० रोजीचे पत्र सादर केले असून त्यामध्ये त्यांनी त्यांना माहिती मिळाली असून या माहितीमुळे त्यांचे समाधान झाले आहे व माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**

**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. इलियासखान पिता अब्दुल मजीदखान, औरंगाबाद-जालना हायवे रोड, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक (माहिती) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मराठवाडा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४१

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

१ श्री. भास्कर दगडू जाधवर, : अपिलार्थी
सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, भूम,
तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्य शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रबंधक, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोणीही हजर नाहीत.

या प्रकरणात या आधी दिनांक १६-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर होते व जन माहिती अधिकारी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरणात संधी देण्यासाठी आज रोजी पुन्हा सुनावणी लावण्यात आली होती. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या माहितीसाठी-च्या मूळ अर्जाच्या व त्यासंदर्भातील प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवरुन, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीचा अनुक्रमे प्रथम अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम अपील अर्ज केल्याचा कोणताही पुरावा जोडलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीकरिता प्रथम जन माहिती अधिकारी

यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करावा व तदनंतर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

विचाराधीन अपिलापुरते पहावयाचे झाल्यास या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला कथित माहितीसाठीचा अर्ज, जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद, मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भास्कर दगडू जाधवर, सार्वजनिक बांधकाम निवासाजवळ, पार्डी रोड, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४४२

निर्णय दिनांक २२-१०-२०१०

१ श्री. मोहंमद अन्वरउल्लाखान, : अपिलार्थी
९-४-४५५, कय्युम प्लॉटस्,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : रजा व प्रशिक्षण राखीव, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर प्रकरणात आज रोजी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

या प्रकरणात या आधी दिनांक १६-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अर्जदार अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

त्यानंतर सदर प्रकरणात संधी देण्यासाठी आज दिनांक २२-१०-२०१० रोजी पुन्हा सुनावणी लावण्यात आली आहे. प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, प्रकरणात अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ते १० शी संबंधित माहिती, अभिप्राय व प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती वगळून १५ दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे पाठविण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सदर माहिती अपिलार्थीस न मिळाल्यास

अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ नुसार राज्य माहिती आयोगाकडे तक्रार करु शकतील.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( भास्कर पाटील )**
**दिनांक २२-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहंमद अन्वरउल्लाखान, ९-४-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा रजा व प्रशिक्षण राखीव, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६३
सुनावणी दिनांक : २५.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रामेश्वर तुळशीराम करपे,<br>रा.माळीवाडगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद | : अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>दुय्यम निबंधक श्रेणी-१, गंगापूर,<br>जि.औरंगाबाद. | : प्रतिवादी | :उपस्थित |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक, वर्ग-१,<br>औरंगाबाद | प्रतिनिधी :<br>श्री. डी.बी.देशपांडे,<br>सह जिल्हा निबंधक<br>वर्ग-२,औ.बाद | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे.आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणात दि.१८.०६.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि. २५.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १५.०७.०९ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना दहा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती, 'त्यांच्या कार्यालयात गटनिहाय ठेवली जात नाही', असे कळवावे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी, सदरची माहिती दि. २५.०६.२०१० रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने अपिलार्थी यांना पाठविण्यात आली असल्याचे आयोगास अवगत केले व त्याबाबतची पोचपावती सादर केली. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. मागील सुनावणीच्या वेळीसुध्दा अनुपस्थित होते. तसेच त्यांनी आयोगास यासंदर्भात कोणताही लेखी अथवा मौखिक जबाबही सादर केला असल्याचे दिसून येत नाही.

वरील दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामेश्वर तुळशीराम करपे,रा.माळीवाडगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५९

सुनावणी दिनांक २५.१०.२०१०

१. श्री. भाऊसाहेब रघुनाथ बोबडे, मु. पो. ईसारवाडी, ता. पैठण, जि. औरंगाबाद : अपिलार्थी : अनुपस्थित

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, (उत्तर) जायकवाडी, ता. पैठण, जि. औरंगाबाद : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| १.जन माहिती अधिकारी : | कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद | :उपस्थित |
| २.जन अपिलीय अधिकारी : | तालुका कृषि अधिकारी, पैठण, जि. औरंगाबाद | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.१०.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणात दि. १८.०६.२०१० रोजी सुनावणी झाली होती. त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित होते.आज रोजी सदर प्रकरणात पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मुद्दा क्र.१ ची माहिती एकूण १०,५०५ पृष्ठांची आहे. त्यामुळे या माहितीचे अपिलार्थी यांनी त्यांच्या कार्यालयात येऊन निरीक्षण केल्यास सोईचे होईल.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी कबूली जबाब दिला. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शेतकऱ्यांच्या योजनेसंदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. या ८ मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक ५ व

६ वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ६ शी संबंधित माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे,देय असणार नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३,४,७ व ८ च्यासंदर्भातील माहितीच्या प्रती देता येतील. तरी ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी व मुद्दा क्र. १ च्या संदर्भात वर उल्लेख केल्याप्रमाणे माहितीचे निरीक्षण करणे संयुक्तिक होत असल्यामुळे, मुद्दा क्र.१ च्या माहितीच्या नस्तीचे निरीक्षण करण्यासाठी एक दिवस निश्चित करुन अपिलार्थीस व्यक्तिशः बोलावण्यात यावे व तसे अपिलार्थीला कळविण्यात यावे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ६ वगळता उर्वरित मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहितीची नस्ती अपिलार्थीस वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व मुद्दा क्र.२,३,४, ७ व ८ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : २५.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब रघुनाथ बोबडे, मु. पो. ईसारवाडी, ता. पैठण, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६१

सुनावणी दिनांक: २५.१०.२०१०

१ श्री. जिजा कडुबा वाघ व बद्रीनाथ बप्पाजी काळे, : अपिलार्थी :उपस्थित
मु. गेवराई, पो. कारकीन, ता. पैठण, जि. औरंगाबद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी :उपस्थित
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती पैठण, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी :
शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प.औरंगाबाद :उपस्थित

त्रयस्थ पक्ष : १) श्री. टी. पी. जाधव :उपस्थित
२) श्री. बोबडे ए. आर. :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या प्रकरणी दि. १८.०६.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. आज पुन्हा प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर्ड पोस्टाने दि.२३.०७.२००९ रोजी माहिती पाठविली होती. ते रजिस्टर्ड पोस्टाचे पाकीट तसेच्या तसे परत प्राप्त झालेले आहे. आज रोजी जन माहिती अधिकाऱ्याने जन अपिलीय अधिकारी यांच्या साक्षीने अपिलार्थीस समक्ष माहिती दिली. सदर

माहितीचा अपिलार्थी यांनी प्रथम अभ्यास करावा. यासंदर्भात अपिलार्थीची काही तक्रार असल्यास ते अधिनियमातील कलम १८ खाली आयोगाकडे तक्रार करु शकतात.

उपरोक्त दोनही सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे ),**
**दिनांक : २५.१०.२०१० राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जिजा कडुबा वाघ व बद्रीनाथ बप्पाजी काळे, मु. गेवराई, पो. कारकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६२
सुनावणी दिनांक : २५.१०.२०१०

१. श्री. शेख अ. हक अ. वहाब (इनामदार), : अपिलार्थी : :उपस्थित
मु. पो. टाकळी राजेराय, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टाकळी राजेराय,
ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती खुलताबाद,
जि. औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी : | ग्राम विकास अधिकारी, ग्रा.पं.टाकळी राजेराय, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद | :उपस्थित |
| २.जन अपिलीय अधिकारी : | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती खुलताबाद, जि. औरंगाबाद | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणात दि. १८.०६.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

या प्रकरणात आज दिनांक २५.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी माहितीच्या पृष्ठसंख्येबाबत आयोगापुढे आक्षेप नोंदविला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.०९.२००९ रोजीच्या पत्रान्वये व दि. ०६.१०.२००९ रोजी प्रत्यक्ष माहिती दिली आहे. अपिलार्थीने याबाबत पोचपावती दिली आहे, तथापि त्यामध्ये माहिती अपूर्ण मिळाल्याचे नमूद केले. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील अप्राप्त माहितीसंबंधी आपल्या युक्तिवादामध्ये खुलासा केला. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील "सभेची उपस्थिती" ही उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे ),**
**दिनांक : २५.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अ. हक अ. वहाब (इनामदार), मु. पो. टाकळी राजेराय, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टाकळी राजेराय, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६५
सुनावणी दिनांक २५.१०.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. भागाजी दौलत गवळी, रा. वालसावंगी, तालुका भोकरदन, जिल्हा जालना | : अपिलार्थी : | | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जालना | : प्रतिवादी : | प्रतिनिधी - श्री. दिलीप यशवंत मस्के, माहिती शिक्षण संवाद तज्ज्ञ | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जालना | | प्रतिनिधी - श्री. गणेश इंगळे, स.अभियंता | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे.आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या प्रकरणाची दिनांक १८.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर प्रकरणात आज रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात येत आहे.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी दि. १५.१२.२००९ रोजी उपलब्ध करुन दिली व सदरची माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली असल्याचे प्रतिपादन करुन त्यांच्या या विधानापृष्टयर्थ त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची पोचसही आयोगास सादर केली होती. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस गट प्रमुख,जलस्वराज्य प्रकल्प, जालना यांच्याकडून त्यांनी आयोगाकडे दि. १४.१०.२००९ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर विनामूल्य माहिती प्राप्त झाली आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी गट प्रमुख, जलस्वराज्य योजना, जालना यांच्याकडे ज्या योजनेसंदर्भात माहिती मागितली होती, त्या योजनेचे स्वरुप शासनाच्या इतर योजनांसारखे नाही. सदर माहिती जलस्वराज्य योजनेअंतर्गत ज्या समितीच्या प्रत्यक्ष ताब्यात असते, ती समिति

स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांचा सहभाग असलेली समिती असते व या समितीवर शासनाचे सरळ नियंत्रण नाही. परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहिती विलंबाने प्राप्त होण्यासाठी आयोगास कोणावरही जबाबदारी निश्चित करता येत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जालना यांच्याकडून आता प्राप्त झाली असल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त दोन सुनावणीच्या वेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५.१०.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. भागाजी दौलत गवळी, रा. वालसावंगी, तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२. जन माहिती अधिकारी तथा गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६७
सुनावणी दिनांक २५.१०.२०१०

१. श्री. एस. एन. काद्री, : अपिलार्थी :उपस्थित
रऊफ कॉलनी, नेहरु भवन जवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा उद्यान अधीक्षक, महानगरपालिका (सिध्दार्थ गार्डन), औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी
तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

आज रोजी प्रत्यक्षात :

जन माहिती अधिकारी : कृषि सहायक, महानगरपालिका, औरंगाबाद :उपस्थित

जन अपिलीय अधिकारी : पर्यावरण संवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद :उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.१०.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, औरंगाबाद शहरातील जुने सिव्हील हॉस्पिटल व सध्या तेथे चालू असलेल्या कॅन्सर हॉस्पिटलच्या परिसरात १९० झाडे लावण्यात आलेली नाहीत व शासकीय दंत वस्तीगृहाच्या पाठीमागे दोन झाडे बेकायदेशीर तोडण्यात आली आहेत त्याच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल का करण्यात आले नाही व कायदेशीर कार्यवाही का करण्यात आली नाही अशी माहिती व या दोनही प्रकरणी आजपर्यंत केलेली कारवाई, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती कळविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

जन माहिती अधिकारी यांनी न दिल्याच्या कारणास्तव अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ०१-०९-२००९ रोजी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात पर्यावरण संवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-१२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी केलेली कारवाई अवगत केली. तथापि हे पत्र स्वीकारण्यास अपिलार्थीने दिनांक १०-१२-२००९ रोजी नकार दिला. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १८.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रकरणात आज दि २५.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०७-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस ती प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

दोनही सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०२-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये निर्देशित दोन प्रकरणांची दिनांक ०२-०७-२००९ पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी केलेली कारवाई हा भाग वगळता उर्वरित कोणत्याही मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ चे अवलोकन करता, अपिलार्थीने जुन्या सिव्हील हॉस्पिटल परिसरात झालेल्या वृक्षतोडीबाबत जन माहिती अधिकारी यांना कथित वस्तुस्थिती अवगत केली आहे. या मुद्यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही, पर्यायाने ही माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे बेकायदेशीर तोडीबाबत संबंधितांवर त्यांनी कायद्यानुसार गुन्हा का दाखल केले नाहीत व कायदेशीर कारवाई का केली नाही अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेली ही माहिती देखील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास आपल्या कृतीचे अथवा निर्णयाचे स्पष्टीकरण करणे अशा प्रकारची प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे याही मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या अर्जाच्या अखेरीस अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी अर्जात निर्देशित केलेल्या

दोन प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०७-२००९ पर्यंत केलेली कारवाई ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अशा प्रकारची केलेली कारवाई म्हणजे, या प्रकरणाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी संबंधित प्राधिकरणांशी दिनांक ०२-०७-२००९ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि या विषयावर त्यांच्या अभिलेख्यावरील दिनांक ०२-०७-२००९ पर्यंतच्या टिपणीच्या प्रती, ही होय. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये निर्देशित केलेल्या दोन प्रकरणात या प्रकरणाशी संबंधित विविध प्राधिकरणांशी दिनांक ०२-०७-२००९ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या व या विषयावरील त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती ही माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत एक कार्यालयीन कामकाजाचा दिवस निश्चित करुन विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली आणि त्यांना देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एस. एन. काद्री, रऊफ कॉलनी, नेहरु भवन जवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि सहायक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पर्यावरण संवर्धन अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६८
सुनावणी दिनांक २५.१०.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिलीप पंढरी कसबे,<br>मु. पो. करडखेल, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : अपिलार्थी | : उपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : प्रतिवादी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर | | : अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी : | नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, उदगीर,<br>तालुका उदगीर, जिल्हा<br>लातूर | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०२.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या अपील अर्जावर अपिलीय अधिकाऱ्याने आदेश न दिल्याने आणि त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "इ. स. १९९३ मध्ये मौ. करडखेल येथील किरकोळ रॉकेल परवाना मंजूर झालेल्या धारकांच्या अर्जाची झेरॉक्स प्रत, मुलाखतीसाठी पाठविलेल्या नोटीशीची प्रत देणे व

परवाना धारकांच्या परवान्याची तारीख व त्याची रिनिव्ह तारीख" अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०१-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १८.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सदर प्रकरणात आज दि. २५.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संचिकेमध्ये उपलब्ध होती ती संचिका राजीव गांधी अभियानामध्ये नष्ट केली असल्याचे आयोगास अवगत केले होते. तसेच अपिलार्थीने ज्या प्रकारची माहिती मागितली आहे त्या प्रकारची माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा दहा वर्षे असल्यामुळे, ती माहिती नष्ट केल्याचा अहवाल त्यांच्या कार्यालयातील अभिलेखापाल यांनी दिला आहे.

मागील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात आले होते की, त्यांच्या कार्यालयातील अभिलेखापाल यांच्याकडून त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संचिकेत उपलब्ध आहे ती संचिका नष्ट केल्याबाबतचा पुरावा प्राप्त करुन घेऊन, ती माहिती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत पुरवावी. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संचिकेमध्ये उपलब्ध आहे ती संचिका नष्ट केल्याचा कोणताही पुरावा त्यांना आढळून आला नाही तर, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यावर होती, त्या कर्मचाऱ्यावर आवश्यकतेप्रमाणे प्रशासकीय स्वरुपाची अथवा

फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी व त्याची प्रत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित करण्यात आले होते. सदरच्या सूचना या आदेशाद्वारे कायम करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, लातूर यांनी विचाराधीन राजीव गांधी अभियानातील संचिका विहित शासन आदेशाप्रमाणे नष्ट करण्याबाबतची संपूर्ण चौकशी करावी व त्यामध्ये अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर यथोचित शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५.१०.२०१०**

**( दी. बा. देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप पंढरी कसबे, मु. पो. करडखेल, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३१३
सुनावणी दिनांक : २५.१०.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. कल्याण सोपानराव सोनवणे,<br>रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अध्यक्ष, जात पडताळणी समिती, (अनुसूचित<br>जाती जमाती), औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, औरंगाबाद | | |

आज रोजी प्रत्यक्षातः

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी : | कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी, कार्यालय सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद | :उपस्थित |
| २. जन अपिलीय अधिकारी : | विधी अधिकारी, कार्यालय अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद | :उपस्थित |
| त्रयस्थ पक्ष : | श्री. व्ही. जी. जोहरी | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.११.२००८ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही विचार न केल्याने आणि त्यावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याची व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. व्ही. जी. जोहरी (अधीक्षक, सरकारी वकिलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, औरंगाबाद) यांच्या जात पडताळणी संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. श्री. व्ही. जी. जोहरी यांचा जात पडताळणी विषयी करण्यात आलेला व्हीजीलियंस रिपोर्ट व संशोधन अधिकारी यांची अहवालाच्या सत्यप्रती.

२. व्ही. जी. जोहरी यांचा नव्याने व्हीजीलियंस रिपोर्ट मागविण्याची कारणे व नव्याने मागितलेल्या अहवालाच्या सत्यप्रती.

३. आपल्या कार्यालया अंतर्गत यापूर्वी किती प्रकरणात नव्याने व्हीजीलियंस रिपोर्ट मागितले त्या प्रकरणांच्या सत्यप्रती. "

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १८.०६.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नव्हते. प्रकरणात आज दिनांक २५.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती इ.स.२००१ पासूनची असून फार मोठया प्रमाणात असल्याचे आयोगास अवगत केले व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री फार मोठया प्रमाणावर वळवावी लागत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, अपिलार्थीने द्वितीय अपील सादर केल्यानंतर माहिती दिली आहे. तथापि या माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झालेले नाही, असे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, मुद्दा क्र. १,२ व ३ च्या संदर्भात नियम व कायद्याच्या प्रती अपिलार्थीस देण्यात याव्यात व व्हिजीलियंस रिपोर्ट व संशोधन अधिकारी

यांच्या अहवालाच्या प्रती माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार सदर माहिती अपिलार्थीस निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी एक महिन्याच्या कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाजाचा दिवस निश्चित करुन अपिलार्थीस सदर माहिती निरीक्षण करता येईल, अशी व्यवस्था करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, मुद्दा क्र. १,२ व ३ च्या संदर्भात नियम व कायद्याच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्याव्यात व व्हिजीलियंस रिपोर्ट व संशोधन अधिकारी यांच्या अहवालाच्या प्रतींची माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे, सदर माहिती अपिलार्थीस निरीक्षणासाठी एक महिन्याच्या आत उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यालयीन कामकाजाचा दिवस निश्चित करुन अपिलार्थीस सदर माहितीचे निरीक्षण करता येईल, असे कळवून निरीक्षणाची व्यवस्था करावी.

**औरंगाबाद** **( दी. बा.देशपांडे ),**
**दिनांक : २५.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, रा. एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी, कार्यालय सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विधी अधिकारी, कार्यालय अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४६९
सुनावणी दिनांक : २५.१०.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नासेर अब्दुल गणी खान,<br>रा. राज कॉम्प्लेक्स, एन-१२, हडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, नुर उर्दू प्राथमिक शाळा, उस्मानपुरा, औरंगाबाद | : | प्रतिवादी | : उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | | | : उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| त्रयस्थ पक्ष : | १) श्रीमती अर्जूमंद बानो अकबर खान | :उपस्थित |
| | २) सचिव, हजरत शाहनुर हम्वी एज्युकेशनल ॲन्ड वेल्फेअर सोसायटी | : उपस्थित |
| | ३) सचिव, शाल्य समिती, नुर उर्दू प्राथमिक शाळा | :अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.०८.२००९ रोजी द्वितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची सुनावणी दिनांक १९.०६.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित होते. सदर प्रकरणात आज दि. २५.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास असे आणून दिले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. त्यासंदर्भातील कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अवलोकनास्तव सादर केली.अपिलार्थीच्या अर्जातील संबंधित संस्थेकडे उपलब्ध असलेली उर्वरित माहिती संबंधित संस्था

शाळेच्या मुख्याध्यापकाकडे अपिलार्थीस देण्याकरिता उपलब्ध करुन देईल व ती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत प्राप्त होईल, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.औरंगाबाद यांनी पहावे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त दोनही सुनावणीच्यावेळी आयोगासमोर आलेल्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी.बा.देशपांडे ),**
**दिनांक : २५.१०.२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नासेर अब्दुल गणी खान, रा. राज कॉम्प्लेक्स, एन-१२, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, नुर उर्दू प्राथमिक शाळा, उस्मानपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४७०

सुनावणी दिनांक : २५.१०.२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बशिरखान हाजीखान,<br>रा. ३०, शिवशंकर सहकारी गृह निर्माण संस्था म.,<br>औरंगाबाद शिवाजीनगर जवळ, औरंगाबाद | : | अपिलार्थी | :अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | प्रतिवादी | :उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | | | :उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.१०.२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. हे अपील आज रोजी आयोगाच्यासमोर विचारार्थ आहे.

यापूर्वी या प्रकरणाची दि.१९.०६.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. सदर प्रकरणाची आज दि. २५.१०.२०१० रोजी पुनश्च् सुनावणी घेण्यात आली.

मागील सुनावणीमध्ये आयोगाने असे निर्देश दिले होते की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वर निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

त्याप्रमाणे आज दि. २५.१०.२०१० रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी श्री.जी. जी. मावळे, तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी आयोगास असे सांगितले की, आयोगाच्या आदेशानुसार तीन दिवसांच्या आत म्हणजे दि. २१.०६.२०१० रोजी उपरोक्त माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेतली व त्याची पोच नस्तीवर असल्याचे दिसून येत आहे. याची प्रत आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५. १०.२०१०**

**( दी. बा.देशपांडे ),**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बशिरखान हाजीखान, रा. ३०, शिवशंकर सहकारी गृह निर्माण संस्था म. औरंगाबाद शिवाजीनगर जवळ, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५१

सुनावणी दिनांक २५-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रल्हाद आबाजीराव कदम,<br>लोकसेवा मंगल कार्यालयासमोर, आशा टाकीज रोड, बीड. | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (बँक), बीड | : प्रतिवादी : | उपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ सहकारी संस्था, बीड | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी गैरहजर होते तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर होते.

आज दिनांक २५-१०-२०१० रोजी प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे दुष्ट हेतूने टाळले असल्यामुळे त्यांना प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे शास्ती लावण्यात यावी आणि त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार खातेनिहाय चौकशी आदेशित करावी.जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी कसूर करुन शिस्तभंग केला असल्याचे अभिप्राय त्यांनी या अपील अर्जामध्ये दिले आहेत. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ' नियमबाहय प्रतिभूती खरेदी-विक्री ' या विषयाबाबत दि. ०१.०१.२००५ ते ३०.०४.२००९ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीमध्ये -विशेष लेखा परीक्षक, वर्ग-२ यांनी या व्यवहारात पाच अधिकाऱ्यास दिलेल्या नोटीसच्या सत्यप्रती, या नियमबाहय व्यवहारासंबंधीच्या पाच जणांच्या खुलाशाच्या सत्यप्रती, दोषी अधिकाऱ्याविरुध्द मा. लेखा परिक्षक,वर्ग-२ यांनी केलेली कार्यवाही, याबाबतच्या एप्रिल, २००९ पर्यंतच्या निर्णयाच्या सत्यप्रती, प्रतिभूती गैरव्यवहाराबाबत नाबार्डने दिलेल्या सूचनापत्रांच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील एकूण चार मुद्यांपैकी तीन मुद्यांवरील माहिती अधिनियमातील कलम ८ (ञ) च्या तरतुदीनुसार नाकारली व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ च्या संदर्भात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मुख्य कार्यालय, बीड यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे दिनांक २२.०६.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचा निर्णय त्यांच्याकडील इतिवृत्त रजिस्टरमध्ये दि. १०.०७.२००९ रोजी नोंदवून,जन माहिती अधिकारी यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेशित केले. तथापि यानंतरही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी असे दिसून आले की, जन माहिती अधिका-याने सदरची माहिती अपिलार्थीस दिनांक २१-०६-२०१० व दिनांक २४-०६-२०१० रोजी व्यक्तीशहा पुरविली आहे व याबाबतची पोचही त्यांना अपिलार्थी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. पत्राची झेरॉक्स प्रत त्यांनी आयोगापुढे सादर केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित तरतुदीमध्ये प्रतिसाद दिला असल्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची विनंती मान्य करता येत नाही.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने व त्याबाबत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना पोच दिली असल्या-कारणाने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २५-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रती,

१. श्री. प्रल्हाद आबाजीराव कदम, लोकसेवा मंगल कार्यालयासमोर, आशा टाकीज रोड, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (बँक), बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५२
निर्णय दिनांक २५-१०-२०१०

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, : अपिलार्थी : अनुपस्थित
ट्रेड युनियन सेंटर, लक्कडकोट, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी (तत्कालीन) : प्रतिवादी :
तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : अनुपस्थित
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

आज रोजी प्रत्यक्षात :

१ जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना : उपस्थित

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर होते.

आज रोजी प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

आज रोजी सध्याचे जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. आयोगास असे आढळून आले आहे की, यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी सन २००५ ते २०१० या कालावधीतील माहिती तयार केली नव्हती तथापि जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी असे सांगितले की, त्यांनी सन २००८, २००९ व २०१० ची माहिती तयार केली आहे व ही माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०६-२०१० रोजी दिलेली आहे असे आयोगास अवगत केले व याबाबत नोंदणीकृत टपालाची पावती सादर केली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ज्या रजिस्टरच्या साक्षांकित प्रतीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे ते रजिस्टर ठेवण्याच्या सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी त्यांच्या दि. २१.१२.२००५

रोजीच्या परिपत्रकान्वये  गट विकास अधिकारी यांना दिलेल्या आहेत. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे दरमहाचे वेतन रेखांकित धनादेशाद्वारे अदा होते की नाही हे पाहण्यासाठी, कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केल्यासंदर्भात नमुना नं.२४ ची प्रत दरमहा ग्रामपंचायतीकडून घेऊन त्याची नोंद पंचायत समिती स्तरावर रजिस्टर ठेवून करण्यात यावी, अशा सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जि.प.जालना यांनी गट विकास अधिकाऱ्यांना दिल्याचे आढळून येत आहे. या सूचना पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाच्या आहेत. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत कळविण्यात आले होते.  उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, जालना यांच्या दि. २१.१२.२००५ रोजीच्या परिपत्रकावर संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड यांनी अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे यासंदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड यांच्यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे त्यांना आवश्यक वाटल्यास प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करु शकतात.

सन २००५ पासून पंचायत समितीने रजिस्टर ठेवलेले नाही.  सन २००५ ते २०१० पर्यंतची रजिस्टरे त्वरित तयार करुन घेण्यासंदर्भात व तयार होतील हे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड यांनी पहावे.  मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना सन २००५ ते २००८ च्या कालावधीतील हा जो प्रमाद घडला आहे त्याची सखोल चौकशी करुन संबंधितावर शिस्तभंग विषयक प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील बाबी लक्षात घेता अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. वर नमूद केल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्या मार्फत प्रचलीत सेवा नियमानुसार चौकशी करुन संबंधित तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड यांच्या-वर सन २००५ ते २००८ या कालावधीतील कागदपत्रे नियमानुसार ठेवली नसल्यामुळे शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २५-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, ट्रेड युनियन सेंटर, लक्कडकोट, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५४

सुनावणी दिनांक २५-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक राजाराम पवार,<br>मु. रोहीला, पो. जेहूर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, कन्नड, जिल्हा औरंगाबाद | | : अनुपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी गैरहजर, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हजर होते.

आज रोजी प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, तेल्या रोग डाळींब वरील मंजूर झालेल्या पॅकेज (योजना) संदर्भात

काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तेल्यारोगावरील पॅकेजमधील अनुदान शेतकऱ्यांना किती तारखेपर्यंत व कशा पध्दतीने संबंधित अधिकारी वितरीत करणार आहेत, ती तारीख किती व दप्तर दिरंगाई करण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आणि सन २००५ पासून शेतकऱ्यांकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या योजनांची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्या माध्यमाद्वारे अपेक्षित आहे, याचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही.

अपिलार्थीने सदरचा अर्ज कृषि अधिकारी, कन्नड जि. औरंगाबाद यांना उद्देशून केला होता. त्यांनी तो अर्ज दि. ०४.०३.२००९ रोजीच्या पत्राव्दारे तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविला व अपिलार्थीस या पत्राची प्रत दिली. या प्रतिसादाने, अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३.०६.२००९ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

दिनांक १७-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांनी दि. ०२.०३.२०१० रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्राद्वारे पाठविली आहे. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली आहे. सदर माहिती यु.पी.सी.द्वारे पाठविल्याबद्दल त्यांनी आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा खुलासा होत नाही. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेली माहिती अपेक्षित असावी, असे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली बरीचशी माहिती ही भविष्यकाळातील असल्यामुळे ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याचे दिसून येत आहे. मात्र या अर्जातील कृषि विभागातर्फे शेतकऱ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दि. ०२.०३.२०१० रोजी पुरविली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.०१.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न दिल्याचे या प्रकरणी सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील

कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब आयुक्त (कृषि) यांना या प्रकरणाशी संबंधित सर्व जन माहिती अधिकारी (तालुका कृषि अधिकारी, कन्नड यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी या पदावर दि. ३०.०१.२००९ ते मार्च, २०१० पर्यंत कार्यरत असलेले सर्व जन माहिती अधिकारी) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहेत.

वरील बाबी लक्षात घेता राज्य माहिती आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयुक्त (कृषि) यांना या प्रकरणाशी संबंधित सर्व जन माहिती अधिकारी (तालुका कृषि अधिकारी, कन्नड यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी या पदावर दि. ३०.०१.२००९ ते मार्च, २०१० पर्यंत कार्यरत असलेले सर्व जन माहिती अधिकारी) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २५-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक राजाराम पवार, मु. रोहीला, पो. जेहूर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५५

सुनावणी दिनांक २५-१०-२०१०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. मोहंमद असलम पिता मोहंमद हुसैन,<br>घर नं. ए/६/३७, आसेफिया कॉलनी, औरंगाबाद | : | अपिलार्थी : | उपस्थित |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | | प्रतिनिधी- श्री. एस. एन. जफर, वक्फ अधिकारी | उपस्थित |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | : | उपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी हजर, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघही गैरहजर होते.

त्यानंतर सदर प्रकरणात पुन्हा आज रोजी सुनावणीसाठी संधी देण्यात आली.

प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता व आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद विचारात घेता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीप्रमाणे देणे भाग आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन यासंदर्भातील वैध पुरावा यासोबत जोडला आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देणे आवश्यक आहे.

वरील बाबी लक्षात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत डाकेने पुरवावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**
**दिनांक २५-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहंमद असलम पिता मोहंमद हुसैन, घर नं. ए/६/३७, आसेफिया कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५६

सुनावणी दिनांक २५-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. परमेश्वर साहेबराव बिडे,<br>ई-७९, शिवधन, शिवशंकर कॉलनी, औरंगाबाद | : | अपिलार्थी : अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>(पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी : |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>विभाग, औरंगाबाद | | |

आज रोजी प्रत्यक्षात :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कन्नड (पश्चिम), जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरणात सुनावणीसाठी संधी देण्यात आली व आज रोजी प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

प्रकरणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे निदर्शनास आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कन्नड (पश्चिम) यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात सन २००७-२००८ व २००८-२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण दोन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीतील निविदांची माहिती, अद्यापपर्यंत दिल्या गेलेल्या देयकाची यादी, आमदार

निधीच्या कामाची सद्यस्थिती, बोरगाव-देवगाव (रंगारी) गावातील गट - ब अंतर्गत चालू असलेल्या कामाचे अंदाजपत्रक, मंजूरी आदेश, मोजमाप पुस्तिकाच्या प्रती व दिनांक ०८-०५-२००९ पर्यंत दिलेल्या देयकाची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १,२७४ इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००९ रोजी केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस काही माहिती दिनांक ०४-०६-२००९ रोजी पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०८-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत मोजमाप पुस्तिकांची माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

दिनांक १७-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच त्यांच्या मूळ अर्जातील कन्नड उपविभागाची सन २००७-०८ व २००८-०९ कालावधीतील कामाची सद्यस्थिती आणि बोरगाव-देवगाव (रंगारी) गट - ब मधील कामांच्या मोजमाप पुस्तिकांच्या प्रती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नाहीत. त्यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत असल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी व त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्यात यावी. अपिलार्थीने असाही युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ६३७ इतक्या पृष्ठांची रक्कम त्यांच्याकडे भरावयास लावली, परंतु प्रत्यक्षात त्यांना ५४७ इतक्या पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०४-०६-२००९ व तदनंतर दिनांक २०-०७-२००९, दिनांक २१-०७-२००९, दिनांक ११-०८-२००९, दिनांक १८-०९-२००९ व दिनांक १५-०९-२००९ रोजी निशुल्क माहिती पुरविली असून अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या कामाच्या सद्यस्थितीची आणि मोजमाप पुस्तिकाच्या प्रतीची माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून ते अपिलार्थीस ही माहिती लागलीच देण्यास तयार आहेत.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण

माहिती एकाच टप्प्यामध्ये दिलेली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी आता त्यांच्याबरोबर आणलेली आहे याचा अर्थ असा होतो की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे संपूर्ण शुल्क स्वीकारुनही त्यांना अद्यापपावेतो संपूर्ण माहिती दिलेली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपूर्ण माहिती दिल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांचे संबंधित सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे, हे अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी एका टप्प्यात संपूर्ण माहिती न दिल्याने आणि अपूर्ण माहिती दिल्याने जन माहिती अधिकारी यांना आता त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीच्या स्वीकृत केलेल्या शुल्कापैकी उर्वरित माहितीचे शुल्क परत करावे लागेल व उर्वरित माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी व याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क त्यांना परत करावे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस देय असणार नाही. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २५-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परमेश्वर साहेबराव बिडे, ई-७९, शिवधन, शिवशंकर कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कन्नड (पश्चिम), जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४५७

सुनावणी दिनांक २५-१०-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख,<br>देशमुख कॉम्प्लेक्स, आठवडी बाजार, सोनपेठ,<br>तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी | : अपिलार्थी : | अनुपस्थित |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : प्रतिवादी : | अनुपस्थित |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी व्दितीय अपील नोंदविले आहे. आज रोजी हे अपील आयोगाच्या समोर विचारार्थ आहे.

या प्रकरणात या आधी दिनांक १७-०६-२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते.

त्यानंतर सदर प्रकरणात सुनावणीसाठी संधी देण्यात आली व आज रोजी प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी लावण्यात आले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही सबळ कारण न देता आणि माहिती न देता त्यांचे प्रथम अपील फेटाळले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील रोजगार योजनेच्या कामासंदर्भात आणि माहिती अधिकार कायदा कलम ४ च्या १७ कामांच्या माहितीसंदर्भात दिनांक ०१-०४-२००५ ते ३०-०६-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयांव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही रोहयो

विभागातील वेगवेगळ्या विभागाशी संबंधित असल्याचे अवगत केले. संबंधितांकडून माहिती प्राप्त करुन अपिलार्थीस ती उपलब्ध करुन देण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहून आवश्यक असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करुन याबाबतची फी चलनाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा करुन कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील खारीज केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

दिनांक १७-०६-२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा लेखापरीक्षण अहवाल व त्यांच्याकडील प्राप्त झालेल्या रोहयो कामाच्या संदर्भातील माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरीत मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादात व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी त्यांच्या कार्यालयाकडील दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये ५८,५४८ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्याकडे न भरल्याने ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठ्या प्रमाणावर आहे व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागेल असे त्यांना वाटते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे ही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सोनपेठ तालुक्यातील रोहयोच्या कामावरील दिनांक ०१-०४-२००५ ते ३०-०६-२००८ या कालावधीमधील सर्व मस्टरच्या झेरॉक्स प्रती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागणार असल्याचा त्यांचा युक्तिवाद आयोग मान्य करीत आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना निश्चितपणे कोणत्या विभागाच्या, कोणत्या हजेरीपटाच्या छायांकीत प्रती व कोणत्या कार्यालयाकडून अपेक्षित आहेत याचा उल्लेख करुन त्यांनी ही माहिती संबंधित यंत्रणे-

कडून वेगळया अर्जाव्दारे मागवावी. मूळात उपजिल्हाधिकारी (रोहयो), परभणी यांच्या कार्यालयाकडे मजुरांच्या हजेरीपटाच्या प्रती ही माहिती कधीही प्राप्त होत नाही, त्यामुळे ही माहिती उपजिल्हाधिकारी (रोहयो), परभणी यांच्याकडे असणे देखील संभवत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली आणि त्यांना देय असलेली माहिती हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये सपष्ट केलेली आणि त्यांना देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( दी. बा. देशपांडे )**

**दिनांक २५-१०-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धनंजय विठ्ठलराव देशमुख, देशमुख कॉम्प्लेक्स, आठवडी बाजार, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.